रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १६०
www.ramprahar.com

◆शनिवार, २७ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆किंमत ₹२

## अंतरंग

लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार; गुन्हा दाखल/२

आंबेनळी घाटातून कार दरीत कोसळून पाच जण जखमी/५

'आरडीसीए'च्या क्रिकेट स्पर्धेत कामोठे संघ विजेता/८

## 'उबाठा'चा काँग्रेसला धक्का; माजी नगरसेवकाचा पक्षप्रवेश



**मुंबई :** येथील महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंची मनसे हे पक्ष एकत्र लढणार आहेत, तर काँग्रेस या निवडणुकीला स्वबळावर सामोरी जाणार हे आता जवळपास स्पष्ट झाले आहे. दरम्यान, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्वबळावर लढणाऱ्या काँग्रेसचे माजी नगरसेवक आणि नेते गळाला लावण्यास सुरुवात केली आहे. याच अनुषंगाने शुक्रवारी (दि. २६) काँग्रेसचे माजी नगरसेवक चंगेज मुलतानी यांना आपल्या पक्षात प्रवेश देत उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसला धक्का दिला आहे. मुलतानी हे जोगेश्वरी पश्चिम भागातील काँग्रेसचे नगरसेवक होते. त्यांनी मातोश्री निवासस्थानी उद्धव ठाकरे यांची भेट घेत त्यांच्या सेनेत प्रवेश केला. या वेळी उद्धव यांनी मुलतानी यांच्या हातात शिवबंधन बांधत त्यांना पक्षात प्रवेश दिला. त्यामुळे काँग्रेस आता काय भूमिका घेणार हे पाहणे महत्त्वाचे असेल.

# उद्धव ठाकरेंकडून मतांसाठी लांगूलचालन

## मुख्यमंत्र्यांची घणाघाती टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथे माजी महापौर रशीद मामू यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश देण्यात आल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत उद्धव ठाकरे यांच्यावर कठोर शब्दांत टीका केली आहे.

मामू यांना शिवसेना (ठाकरे) पक्षात मिळालेल्या पक्ष प्रवेशाबद्दल बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मला अतिशय दुःख आहे, की हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या सुपुत्राने अशा प्रकारे मतांचे लांगूलचालन करण्यासाठी अशा व्यक्तीला प्रवेश दिला आहे. यातून त्यांचे चरित्र आणि त्यांची दिशा स्पष्ट होत आहे. त्यांना आता लांगूलचालन करायचे आहे. विशिष्ट लोकांचे जोडे चाटायचे आहेत आणि त्यातून मते मिळवायची आहेत, पण जनता हे बघत आहे. देशप्रेमी, देशभक्त आणि राष्ट्रवादी लोकं हे पाहत आहेत. त्यामुळे याचं नुकसान त्यांना सहन करावं लागेल, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले.



महायुतीची घोषणा आणि जागावाटप याविषयी विचारले असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, आम्हाला घोषणा करण्याची आवश्यकता नाही, आम्ही एकत्रच आहोत. ते वेगवेगळे (ठाकरे बंधू) होते. पुतिन आणि झेलेन्स्की एकत्र आले तर युती करावी लागते. त्यामुळे त्यांनी ती केली, पण त्यांनी काय केलं ते माहितीच नाही. केली म्हणतात, पण जागा घोषित केल्या नाहीत. आमचं नीट चाललं आहे. सगळं झालं की सांगू.

दरम्यान, शीख पंथीयांचे दहावे गुरु श्री गुरु गोविंद सिंगजी यांचे सुपुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग (वय ९) आणि साहिबजादे बाबा फतेह सिंग (वय ७) यांच्या अद्वितीय शौर्य व बलिदानाच्या स्मरणार्थ वीर बाल दिवसानिमित्त सायन येथील गुरूद्वारा गुरू तेग बहादूर दरबार या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तेथे मुख्यमंत्र्यांनी वीर शहीद साहिबजादे यांना विनम्र अभिवादन करून त्यांच्या शौर्याचे स्मरण केले.

## खोपोली हादरली! नवनिर्वाचित नगरसेविकेच्या पतीची निर्घृण हत्या

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषदेच्या नवनिर्वाचित शिवसेना नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती माजी नगरसेवक मंगेश काळोखे यांची शुक्रवारी (दि. २६) सकाळी अज्ञात मारेकऱ्यांनी धारधार शस्त्रांनी हत्या केली. या हत्येच्या निषेधार्थ खोपोलीत बंद पाळण्यात आला तसेच मुंबई-पुणे महामार्ग काही काळ रोखून धरण्यात आला होता.



मंगेश काळोखे सकाळी आपल्या मुलीला शाळेत सोडून साईबाबा नगर येथील घरी परतत होते. त्या वेळी विहारी पुलाजवळ हॉटेल जयाबारसमोरील चौकात काळ्या कारमधून आलेल्या पाच हल्लेखोरांनी तीक्ष्ण हत्यारांनी काळोखे यांच्यावर वार करून पलायन केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या काळोखे यांनी जागेवरच प्राण सोडले.

काळोखे यांच्या हत्येनंतर खोपोलीत खळबळ उडाली. जोपर्यंत हल्लेखोरांना ताब्यात घेत नाहीत तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही असा पवित्रा काळेखे यांच्या नातेवाईकांनी घेतला, तर कुटुंबियांसह कार्यकर्त्यांनी खोपोली पोलीस ठाण्यासमोर ठाण मांडले. नंतर मुंबई-पुणे महामार्ग रोखून धरत चक्का जाम आंदोलन केले.

दरम्यान, रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी घटनास्थळी भेट दिली. हल्लेखोरांना पकडण्यासाठी लोणावळा, पुणे, पनवेल, कर्जत येथे पोलीस पथके रवाना केली आहेत. हल्लेखोर लवकरच ताब्यात येतील, असा विश्वास अधीक्षक दलाल यांनी व्यक्त केला आहे.

## प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांचे वितरण

### महाराष्ट्राच्या अर्णव महर्षीचा गौरव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वीर बाल दिनाचे औचित्य साधून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते २० मुलांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५ने शुक्रवारी (दि. २६) सन्मानित करण्यात आले. यामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कामगिरीसाठी महाराष्ट्राच्या छत्रपती संभाजीनगर येथील अर्णव महर्षीला गौरविण्यात आले. त्याने लकवाग्रस्त रुग्णांच्या हातांसाठी एआय-आधारित पुनर्वास उपकरण आणि ॲक्टिव्ह हँड रिस्ट बँडचा शोध लावला आहे.



महिला व बाल विकास मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सात क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी देशभरातील १८ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधील २० बालकांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५ प्रदान केले. सोहळ्यास केंद्रीय महिला व बाल विकासमंत्री अन्नपूर्णा देवी, राज्यमंत्री सावित्री ठाकूर, सचिव अनिल मलिक आदी मान्यवर उपस्थित होते.

शौर्य, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-संस्कृती, समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण अशा क्षेत्रांतील या बालकांना गौरविण्यात आले. यापैकी दोघांना मरणोत्तर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारार्थींमध्ये नऊ मुले आणि ११ मुलींचा समावेश आहे. पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या वेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करून ही बालके भारताच्या अमृत पिढीचे खरे प्रतिनिधी आहेत, असे म्हटले.

## मयूर शेळके, अश्विन डिचोलकर समर्थकांसह भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे खंबीर नेतृत्व, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विकासात्मक धोरण आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत नवीन पनवेलमधील प्रसिद्ध चिंतामणी मित्र मंडळाचे अध्यक्ष मयूर शेळके आणि उपाध्यक्ष अश्विन डिचोलकर यांनी आपल्या अनेक समर्थकांसह भाजपचा झेंडा हाती घेतला आहे. या सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षात स्वागत केले.



या कार्यक्रमास उरण मतदारसंघाचे आमदार व पनवेल महापालिका निवडणूक प्रमुख महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर, माजी नगरसेवक समीर ठाकूर, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, सरचिटणीस रूपेश नागवेकर, ज्येष्ठ नेते अशोक शेळके उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल परिसरात झालेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे अनेक सामाजिक कार्यकर्ते भाजपच्या विचारधारेकडे आकर्षित होत आहेत. याच पार्श्वभूमीवर मयूर शेळके आणि अश्विन डिचोलकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी नवनियुक्त कार्यकर्त्यांना भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवण्याचे आवाहन केले.

पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा पक्षप्रवेश अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. चिंतामणी मित्र मंडळाचा मोठा जनसंपर्क आणि तरुण कार्यकर्त्यांचे जाळे भाजपसाठी जमेची बाजू ठरणार आहे. या पक्षप्रवेशामुळे नवीन पनवेल परिसरात भाजपची संघटनात्मक ताकद अधिक वाढली आहे.

## निवडक

### हिंदूवरील हिंसाचारासंदर्भात भारताचा बांगलादेशला इशारा

**नवी दिल्ली :** बांगलादेशातील मैमनसिंग येथील हिंदू युवक दीपू चंद्र दास यांच्या हत्येचा भारताने शुक्रवारी (दि.२६) निषेध केला. बांगलादेशातील हिंदूसह अल्पसंख्याकांवरील हिंसाचाराच्या घटनांना माध्यमांची अतिशयोक्ती म्हणून दुर्लक्षित केले जाऊ शकत नाही किंवा राजकीय हिंसाचार म्हणून फेटाळले जाऊ शकत नाही, असा इशारा भारताने दिला. अल्पसंख्याकांबद्दलचा 'सततचा द्वेष' ही एक गंभीर चिंतेची बाब असल्याचे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

### केरळमध्ये भाजपचा महापौर; डाव्यांच्या वर्चस्वाला धक्का!

**तिरुवनंतपुरम :** केरळच्या राजकारणात भाजपने शुक्रवारी (दि. २६) एक नवा इतिहास रचला. भाजपचे ज्येष्ठ नेते व्ही.व्ही. राजेश यांची तिरुवनंतपुरम महापालिकेच्या महापौरपदी निवड झाली असून केरळमध्ये भाजपचा महापौर होण्याची ही पहिलीच वेळ आहे. गेल्या ४५ वर्षांपासून या महापालिकेवर असलेल्या डाव्यांच्या (सीपीएम) वर्चस्वाला सुरुंग लावत भाजपने हा ऐतिहासिक विजय मिळवला आहे.

## 'मिशन लक्ष्यवेध' अंतर्गत रायगडात क्रीडा प्रतिभा विकास केंद्रास शासनाची मान्यता

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य शासनाने मिशन लक्ष्यवेध या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यात क्रीडा प्रतिभा विकास केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. या केंद्रामध्ये टेबल टेनिस, कुस्ती, बॅडमिंटन, ॲथलेटिक्स आणि शूटिंग या पाच खेळांचा समावेश असणार आहे.

राज्यातील अधिकाधिक खेळाडूंनी ऑलिम्पिक तसेच जागतिक स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन पदके प्राप्त करावीत या उद्देशाने शासनाने क्रीडा प्रशिक्षणासाठी त्रिस्तरीय रचना विकसित केली आहे. त्यामध्ये राज्यस्तरावर हाय परफॉर्मन्स सेंटर, विभागीय स्तरावर स्पोर्ट्स एक्सलन्स सेंटर आणि जिल्हास्तरावर क्रीडा प्रतिभा विकास केंद्र उभारण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून रायगड जिल्ह्यासाठी हे अनिवासी स्वरूपाचे केंद्र सुरू होणार आहे.

या योजनेंतर्गत २० खेळाडूंची निवड करण्यात येणार असून निवडलेल्या खेळाडूंना तज्ज्ञ क्रीडा मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मार्गदर्शकांना आकर्षक मानधन दिले जाईल. यासोबतच अत्याधुनिक क्रीडा साहित्य, प्रत्येक खेळाडूस स्पोर्ट्स कीट, पूरक आहार, देशांतर्गत स्पर्धांमध्ये सहभागाचा खर्च, स्पोर्ट्स सायन्स सेंटर, वैद्यकीय उपचार व विमा खर्च, समुपदेशन केंद्र तसेच सराव व लीग स्पर्धांचे आयोजन अशा सर्व सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

खेळाडूंची निवड प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी किंवा पदक विजेते खेळाडू, विभागीय स्तरावर राष्ट्रीय स्तरावर सहभागी किंवा पदक विजेते खेळाडू, तर हाय परफॉर्मन्स सेंटरसाठी राष्ट्रीय स्तरावरील पदक विजेते व भारतीय संघासाठी संभाव्य खेळाडूंची निवड केली जाणार आहे.

दरम्यान, जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्र रायगडचा सविस्तर आराखडा लवकरच निश्चित करण्यात येणार आहे. यासाठी ॲथलेटिक्स, टेबल टेनिस, बॅडमिंटन, कुस्ती व शूटिंग या खेळांसाठी इच्छुक व पात्र क्रीडा मार्गदर्शकांनी इतर आवश्यक प्रमाणपत्रांसह ३१ डिसेंबरपर्यंत संबंधित कार्यालयात अर्ज सादर करावेत तसेच या खेळांचे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यास इच्छुक असलेल्या केंद्रप्रमुखांनी आवश्यक माहितीसह अर्ज सादर करावा, असे कळविण्यात आले आहे.

## दिनदर्शिकेचे प्रकाशन



**पनवेल : उत्कर्ष सांस्कृतिक कला आणि क्रीडा मंडळाच्या वतीने येत्या २०२६ सालची दिनदर्शिका प्रसिद्ध करण्यात आली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी त्यांनी मंडळाच्या कार्याचे कौतुक करून सर्वांना शुभेच्छा दिल्या. प्रकाशन समारंभास माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, हेमंत भुजबळ, प्रशांत फुलपगार, राकेश भुजबळ, अनंत जाधव आदी उपस्थित होते.**

## मुरूडमध्ये पर्यटकांची मांदियाळी



**मुरूड : नाताळची सुट्टी आणि वीकेण्डमुळे प्रसिद्ध पर्यटनस्थळ मुरूडमध्ये पर्यटकांची गर्दी होऊ लागली आहे. येथे आलेले पर्यटक समुद्रस्नानासह विविध खेळांचा आनंद घेत असल्याचे चित्र आहे.** (छाया : सुधीर नाझरे) **वृत्त पान ७ वर..**

## सामन्यादरम्यान खेळाडू दुखापतग्रस्त

**जयपूर : वृत्तसंस्था**

विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत जयपूरमध्ये उत्तराखंड विरुद्ध मुंबई यांच्यात सामना खेळवला गेला. हा सामना मुंबईने ५१ धावांनी जिंकला, मात्र या सामन्यादरम्यान मैदानात एक अपघात घडला, ज्यात मुंबईचा खेळाडू अंगक्रिश रघुवंशी याला दुखापत झाली आहे.

रिपोर्ट्सनुसार अंगक्रिश रघुवंशीने कॅच पकडताना डाइव्ह मारली, त्या वेळी त्याच्या मानेला गंभीर दुखापत झाली. ही दुखापत एवढी गंभीर होती की अंगक्रिश त्याची मानसुद्धा वळवू शकला नाही. दुखापतीची गंभीरता पाहून मैदानात स्ट्रेचर आणण्यात आले आणि अंगक्रिशला बाहेर नेण्यात आले. त्याला रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. अंगक्रिच्या प्रकृतीबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातही विविध विकासकामे

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून आणि त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे चिंध्रण परिसरामध्ये अनेक विकासकामांना गती मिळाली आहे. या विविध कामांचा शुभारंभ आणि लोकार्पण सोहळा भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २६) झाला.

चिंध्रण सारनाथ बुद्धविहार येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतंर्गत ४० लाख रुपये खर्चून उभारण्यात येणारे सभागृह व सुशोभीकरण तसेच आमदार ठाकूर यांच्या २५ : १५ निधीतून १० लाख रुपये खर्चाच्या अंतर्गत



रस्ता काँक्रीटीकरणाच्या कामाचे भूमिपूजन या वेळी करण्यात आले. याचबरोबर महिला बचत गटाच्या इमारतीचे भूमिपूजन आणि वपल येथे एमएमआरडीएच्या ४० लाख रुपयांच्या निधीतून पाले बुद्रुक मुख्य रस्ता ते गणेशनगरपर्यंत रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. कल्पेश शहा यांचे घर ते गणपती मंदिर या भागातील १३ लाख रुपये खर्चाचे अंतर्गत गटार व काँक्रीटीकरण, कोणार्क बिल्डिंग ते वसंत पाटील यांच्या घरापर्यंतचा रस्ता आणि जिल्हा परिषद सेस फंडातून १० लाख रुपये खर्चून पूर्ण करण्यात आलेल्या मोतीराम टेंबे ते अप्पा महादेव पाटील यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे लोकार्पण करण्यात आले. **(पान २ वर..)**

# मानवतेच्या मार्गावर चालण्यासाठी कृतीतून संकल्प करूया -मुख्यमंत्री

## वीर बाल दिवसानिमित्त साहिबजादांच्या शौर्याला नमन

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

शीख पंथीयांचे दहावे गुरू श्री गुरु गोविंद सिंगजी यांचे सुपुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग (वय ९ वर्षे) आणि साहिबजादे बाबा फतेह सिंग (वय ७ वर्षे) यांच्या अद्वितीय शौर्य व बलिदानाच्या स्मरणार्थ २६ डिसेंबर हा दिवस 'वीर बाल दिवस' म्हणून पाळला जातो. वीर बाल दिवसाच्या निमित्ताने गुरूंनी दाखविलेल्या मानवतेच्या मार्गावर चालण्यासाठी आणि त्यांच्या विचारांना आपल्या जीवनात अंगीकारण्यासाठी आपण स्वतःला कृतीतून संकल्पित केले पाहिजे. साहिबजादांच्या धैर्याने आणि बलिदानाने भारतीय इतिहासाला नवी दिशा दिली असून, त्यांचे शौर्य सदैव पिढ्यान्पिढ्यांना प्रेरणा देत राहील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



सायन येथील गुरूद्वारा गुरू तेग बहादूर दरबार येथे वीर बाल दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीर शहीद साहिबजादे यांना विनम्र अभिवादन करून त्यांच्या अद्वितीय शौर्याचे स्मरण केले. यावेळी गुरूद्वारा समितीच्या सदस्यांनी किर्तन, कविता वाचन केले आणि वीर शहीद साहिबजादे यांना आदरांजली अर्पण केली.यावेळी आमदार प्रसाद लाड, आमदार तमिल सेल्वन, श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम समितीचे राज्यस्तरीय समन्वयक रामेश्वर नाईक, पंजाबी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष बल मलकित सिंह, गुरुद्वारा समितीचे सदस्य दलजीत सिंग, गुरुदेव सिंग, जसपाल सिंग सिद्धू, हॅपी सिंग, डॉ. अजयसिग राठोड यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राष्ट्रासाठी आपले शीश समर्पित करणाऱ्या गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या महान बलिदानाला देश कधीही विसरणार नाही. श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या संपूर्ण परिवाराने देश, संस्कृती आणि संस्कारांसाठी दिलेले बलिदान इतिहासात अजरामर आहे. २६ डिसेंबरला वीर बाल दिवस साजरा करण्याचा निर्णय महत्त्वपूर्ण आहे. गुरु तेग बहादूर यांनी शेवटपर्यंत आपले रक्षण केले असल्याने त्यांच्या इतिहास सर्वांनी कायम लक्षात ठेवावा.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दहावे गुरु श्री गुरू गोविंद सिंगजी यांचे सुपुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग (वय ९ वर्षे) आणि साहिबजादे बाबा फतेह सिंग (वय ७ वर्षे) यांच्या अद्वितीय शौर्य व बलिदानाचे स्मरण करण्याचा आजचा दिवस आहे. वीर बाल दिवसानिमित्त या वीर, शहीद साहिबजादांना नमन करून त्यांच्या जीवनातील दृढता, धैर्य आणि निष्ठा आपल्यातही यावी, अशी प्रार्थना आज गुरूंना करूया, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी, ज्यांच्या बलिदानामुळे आपले अस्तित्व आहे, त्यांचे कायम स्मरण ठेवणे हाच यशस्वी भविष्यासाठीचा मार्ग आहे, असे सांगितले आहे. साहिबजादांच्या शौर्याच्या स्मरणार्थ 'वीर बाल दिवस' साजरा करण्याचा निर्णय घेतला. आजच्या दिवशी गुरूंना आणि त्यांच्या परिवाराच्या बलिदानाला सामूहिकरित्या स्मरण करून, मानवतेच्या रक्षणासाठी सज्ज होण्याचा आणि गुरूंच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया.

## विदेशी मद्य तस्करीवर कारवाई

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य उत्पादन शुल्क पनवेल शहर विभाग यांनी गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य तस्करीवर धडक कारवाई केली. यावेळी ६६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

२४ डिसेंबर रोजी निखिल अशोक तामघाडे हा इसम मडगाव ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल तेजस एक्सप्रेसने गोवा राज्य निर्मित आणि विक्रीसाठी असलेल्या दारुने भरलेली बॅग घेऊन विक्रीच्या उद्देशाने उतरणार असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क पनवेल यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी सापळा रचला. मात्र आरोपीला चाहूल लागल्याने त्याने ती बॅग प्लॅटफॉर्मवर टाकली आणि रेल्वेमध्ये पुन्हा चढून रेल्वे बरोबर पुढे निघून गेला. यावेळी ठाणे रेल्वे स्टेशन येथे माल घेण्यासाठी आलेला आरोपी पंकज नीलकंठ नेमोडे याला अटक केली. त्यानंतर मुख्य आरोपी निखिल याला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल मुंबई येथे अटक करण्यात आली.

## तरुण बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुण कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.विश्वास कमल शर्मा (१८ वर्षे ९ महिने) हा वाकडी येथे राहणारा असून तो कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेला आहे. शरीर बांधाने मजबूत, उंची ५ फुट ६ इंच, रंग गोरा, डोक्याचे केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा गोल, दाढी मिशी नाही, अंगात सफेद रंगाचा टी-शर्ट व लाईट ब्ल्यू कलर व ब्लॅक कलरची जिन्स पॅन्ट, पायात पांढर्या रंगाचे बुट असून त्याला इंग्रजी, हिंदी व मराठी भाषा अवगत आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा हवालदार धनाजी तांडेल यांच्याशी संपर्क साधावा.



## ग्राहक दिनानिमित्त पथनाट्याद्वारे जनजागृती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

ग्राहकांचे सुरक्षिततेचा हक्क, माहिती मिळविण्याचा हक्क, निवडीचा हक्क, तक्रार निवारणाचा हक्क, बाजू ऐकून घेतली जाण्याचा हक्क तसेच ग्राहक शिक्षणाचा हक्क आदी हक्कांचे संरक्षण व संवर्धन व्हावे, यासाठी ग्राहकांनी जागरूक राहून शासनाला सहकार्य करावे, आपल्या जबाबदाऱ्या व कर्तव्यांची जाणीव ठेवावी, खरेदी करताना किंमत व गुणवत्तेची तपासणी करावी तसेच फसवणूक टाळण्यासाठी योग्य ठिकाणी तक्रार निवारणासाठी दाद मागावी, याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात आले.



त्याच अनुषंगाने जिल्हा पुरवठा कार्यालय, रायगड-अलिबाग, अन्न व औषध प्रशासन, पेण, वैध मापन विभाग, अलिबाग तसेच प्रिझम सामाजिक विकास संस्था, चेंढरे-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ डिसेंबर रोजी अलिबाग समुद्रकिनारा व अलिबाग बस स्थानक येथे जागो ग्राहक जागो पथनाट्य सादर करण्यात आले. या पथनाट्यातून ग्राहकांच्या अधिकारांविषयी प्रभावीपणे जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमास जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबागचे न्यायमूर्ती विजय जाधव, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी. दिपाली ब्राम्हणकर, पुरवठा निरीक्षण अधिकारी हर्षल देशमुख, .तपस्वी गोंधळी उपस्थित होते.



**उरण : माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती उरण भाजप संपर्क कार्यालयात आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत गुरुवारी साजरी करण्यात आली. या वेळी आमदार महेश बालदी, भाजप जिल्हा कार्यकारिणी सदस्य सुनील पाटील, करंजा मच्छीमार सोसायटी सदस्य राजेश नाखवा, जे.डी. जोशी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. श्रद्धेय अटलजींच्या प्रतिमेस पुष्पहार घातल्यानंतर सर्वांनी विनम्र अभिवादन केले.**

## लग्नाचे आमिष दाखवून घटस्फोटितेवर लैंगिक अत्याचार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथे राहणाऱ्या एका ३९ वर्षीय व्यक्तीने त्याच भागात राहणार्या घटस्फोटित महिलेला लग्नाचे वचन देऊन तिच्यासोबत वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवून तिच्याकडून सात लाख रुपये उकळून तिची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. राकेश लदबे असे या व्यक्तीचे नाव असून वाशी पोलिसांनी त्याच्याविरोधात बलात्कार, फसवणुकीसह शिवीगाळ व धमकी देणे कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील पीडित महिला पनवेल भागात आपल्या दोन मुलांसह राहण्यास असून, तिचा घटस्फोट झाला आहे. मार्च २०२३ मध्ये आरोपी राकेश लदबे याची पीडित महिलेसोबत ओळख झाली होती. या ओळखीतून त्यांच्यामध्ये प्रेमसंबंध निर्माण झाल्यानंतर अरोपी राकेश लदबे याने पीडित महिलेला लग्नाचे वचन देऊन तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने पीडित महिलेला वाशीतील जुहूगाव येथील सरस्वती बिल्डिंगमध्ये नेऊन तिच्यासोबत अनेक वेळा शरीरसंबंध प्रस्थापित केले. याच कालावधीत आरोपीने पीडित महिलेकडून वेगवेगळी कारणे सांगून तिच्याकडून सात लाख रुपये उकळले.

मागील तीन वर्षांपासून आरोपीने पीडित महिलेवर लैंगिक अत्याचार केले. दरम्यानच्या काळात पीडित महिलेने आरोपीकडे पैसे परत मागितले असता, त्याने पैसे परत करण्यास नकार दिला. तसेच पीडित महिलेला शिवीगाळ व मारहाण करीत तिला धमकावले. या प्रकारानंतर पीडित महिलेने दोन दिवसांपूर्वी खांदेश्वर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली होती.

## खारघरमधील हुक्का पार्लरवर छापा; मॅनेजरसह दोघांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

तंबाखूजन्य पदार्थांचा वापर करून हुक्का पार्लर चालवण्यास कायद्याने बंदी असूनही खारघर येथील दि स्मोक कॅफेमध्ये सर्रासपणे बेकायदेशीर हुक्का पार्लर चालवले जात असल्याचे उघडकीस आले.

खारघर पोलिसांनी या बेकायदेशीर हुक्का पार्लरवर छापा मारून मॅनेजरसह दोघांना अटक केली आहे. तसेच हुक्का ओढण्यासाठी लागणारे साहित्य व वेगवेगळ्या प्रकारचे फ्लेवर जप्त केले आहेत.

खारघर सेक्टर ३, बेलपाडा येथील दि स्मोक कॅफेमध्ये बेकायदेशीररीत्या हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती खारघर विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्तांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक सुरज जाधव व त्यांच्या पथकाने छापा टाकून कारवाई केली. कॅफेचा मॅनेजर जियाद नासिर बहादुरकर आणि वेटर फहिम निजाम अहमद या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दोघांना अटक केली आहे.

## महाडमध्ये ३० वर्षांनी जिवलग मित्रांची भेट

**महाड : प्रतिनिधी**

३० वर्षां नंतर महाड मधील वी. ह. परांजपे विद्या मंदिर व कै.सौ.पा.म. थळवळ कन्या विदयालय महाड यांच्या सन १९९४ - ९५ दहावी बॅच चे स्नेह संमेलन राऊळ फार्म हाऊस चापगांव महाड येथे पार पडले. या स्नेहल संमेलना साठी ११२ जणांनी उपस्थित दर्शवली. आता पर्यंत महाड मध्ये झालेल्या इतर गेट टुगेदर पेक्षा सर्वात जास्त संख्या या ग्रुप असल्याचे सांगण्यात येत आहे.

तीस वर्षांनी भेट होणार म्हणून या गेट-टुगेदर साठी साठी परदेशात असलेल्या मित्रांनी देखील हजेरी लावली होती. या कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन यतीन टमके व तुषार बुटाला यांनी केले. तर प्रस्तविक अमित म्हामुणकर, रुपाली कांबळे व समिधा संसारे चांढवेकर यांनी केले.

या कार्यकामात प्रत्येकाला आपली कला सादर करण्याची संधी देण्यात आली. तसेंच प्रत्येकाला रिटर्न गिफ्ट म्हणून डायरी, ट्रॉफी व ग्रुप फोटो देण्यात आला.



पान १ वरुन

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातही विविध विकासकामे

याशिवाय जिल्हा वार्षिक योजनेतून बसवण्यात आलेले तीन सोलर हायमास्ट आणि १० सोलर स्ट्रीट लाईट्सदेखील जनतेसाठी समर्पित करण्यात आले.

या शुभारंभावेळी भाजप नेते एकनाथ देशकर, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी सरपंच कमला देशेकर, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, उत्तर मंडळ सरचिटणीस अंकुश पाटील, रमेश कोटणी, माजी नगरसेविका अरुणा दाभणे, सरपंच एकनाथ पाटील, माजी सरपंच रघुनाथ फराड, शिवाजी दुर्गे, प्रकाश खैरे, अरविंद गोंधळी, धनाजी पाटील, अंकुश पाटील, अशोक साळुंखे, धनंजय पाटील, लक्ष्मण पाटील, महेश पाटील, रवींद्र पाटील, बाळकृष्ण पाटील, निवृत्ती पाटील, नंदकुमार भोपी, रूपेश पावशे, सीबी पाटील, हरिचंद्र गोंधळी, माजी उपसरपंच गणपत देशेकर, वलप गाव अध्यक्ष प्रभाकर पाटील, वावंजे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष प्रकाश खैरे, डॉ. संतोष आगलावे, गणपत कडू, अनंता कडू, नरेश सोनावले, दिनेश पाडेकर, शंकर देशेकर, अभिमन्यू पाटील, राजेंद्र पाटील, शांताराम कुंभारकर, ग्रामपंचायत सदस्य संतोष देशेकर, मनोज कुंभारकर, कुसुम पाटील, जीवन पाडेकर, सुरेश पाटील, चंद्रकांत पाटील, लहूशेठ पाटील, कोंडीराम पाटील, काळुराम घोडिंदे, मोतीराम टेंबे, रामदास पाटील, हिरामण पाटील, हरिश्चंद्र पाटील, बाबूशेठ मुंबईकर, रूपेश मुंबईकर, सुरेश मुंबईकर, बाळकृष्ण पाटील, नासिर शेख, नंदू भोपी, सागर सांगडे, प्रकाश खाडेकर, किरण पाटील, युवराज पाटील, जीवन पाटील, सोपान खाडेकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या विकासकामांमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

### गुन्ह्यातील जप्त वाहनांचा नेरुळमध्ये आज लिलाव

**पनवेल :** पोलीस ठाण्याच्या आवारात विविध गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेल्या एकूण १० वाहनांचा लिलाव नेरुळ पोलीस ठाण्याच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.सदर लिलाव हा २७ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून यामध्ये प्रामुख्याने चार चाकी बोलेरो जीप क्र.एमएच-४८-एच-३२७८, मारुती व्हॅगेनर गाडी क्रं.एमएच-४३-बीजे-०२७३, तीन चाकी वाहनांमध्ये बजाज ऑटो रिक्षा क्र.एमएच-४३-बीएफ-७२५३, बजाज ऑटो रिक्षा क्र.एमएच-०३-बीए-५६८९, दुचाकीमध्ये होंडा ॲक्टीव्हा एमएच-०५-डीयू-२८५२, बजाज पल्सर एमएच-४३-१७१, बजाज पल्सर १५० क्र.एमएच-४८-झेड-७४४५, बजाज पल्सर एमएच-०३-बीडी-३७५२, बजाज पल्सर एन १६० क्र.बीआर-०७-एवाय-७२८८ व हिरो होंडा पॅशन क्र.एमएच-१२-ईआर-७७६२ या गाड्यांचा समावेश आहे.

## 'पोस्को'च्या मदतीने महिला उद्योगाची ओळख पोहचली सर्वदूर

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील दहिवली येथे कोकणी तानाबाना महिला उद्योग समूहाच्या वतीने २४ डिसेंबर २०२५ रोजी बीज निधी आढावा बैठक यशस्वीपणे पार पडली. या बैठकीत पोस्को कंपनीकडून देण्यात आलेल्या ३,५०० मीटर कापडाच्या स्वरूपातील दानाचा बीज निधी म्हणून झालेला उपयोग, तसेच भविष्यातील योजना यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



ग्रामीण भागातील १५ महिलांनी एकत्र येत पावसाळ्यासारख्या कठीण परिस्थितीतही मागील १० महिन्यांत १६,००० कापडी पिशव्या शिवून पूर्ण केल्या. या उपक्रमातून महिला समूहाने एकत्रितपणे सुमारे १ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवून ग्रामीण महिला उद्योजकतेचे प्रभावी उदाहरण सादर केले आहे.

या शिवणकाम केंद्रासाठी टी. एन. भोस्तेकर विद्यालयाने आवश्यक जागा उपलब्ध करून दिली. तसेच श्रृंखला, सेवा सहयोग (मुंबई), सेवावर्धिनी, शुभारंभ सुपर मार्केट आणि रायगड उद्योग परिषद यांनी उत्पादनांच्या प्रचार व विक्रीसाठी स्थानिक तसेच पुणे व मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

या उपक्रमात सेवा इंटरनॅशनलने Oracle सामाजिक निधीच्या माध्यमातून महिलांना संधी दिली, तर पोस्को कंपनीने या उपक्रमाची स्थिरता मजबूत करण्यासाठी मोलाची भूमिका बजावली. ऑराग्यान फाउंडेशन या महिला उद्योग समूहाशी सातत्याने समन्वय साधत असून, नव्या उत्पादनांच्या शक्यता आणि इतर गावांतील महिलांसाठीही असेच प्रेरणादायी उपक्रम उभारण्यावर भर देत आहे.

येत्या काळात ऑराग्यान फाउंडेशनकडून रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील भादाव येथे सामाजिक विकास केंद्र उभारण्यात येणार असून, त्याद्वारे अधिक महिला, युवक आणि विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

पोस्कोच्या अधिकाऱ्यांनी बीज निधीच्या प्रगतीचा आणि भविष्यातील योजनांचा आढावा घेतला.

## स्वरयोगिनी पद्मविभूषण डॉ. प्रभा अत्रे, रामचंद्र गुंडो देसाई यांना उद्या संगीतमय श्रद्धांजली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशन - स्वरमयी गुरुकुल, पुणे संचालित श्री. शांताराम शास्त्रीय संगीत विद्यालय, नवीन पनवेल यांच्या वतीने रविवार, दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी एक विशेष संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम कर्नाटक संघ, सेक्टर-२, नवीन पनवेल येथे सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

संगीतपरंपरेत आपले बहुमोल योगदान देणाऱ्या स्वरयोगिनी पद्मविभूषण डॉ. प्रभा अत्रे यांना द्वितीय तसेच रामचंद्र गुंडो देसाई यांना पस्तीसाव्या पुण्यतिथीनिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे ख्यातनाम गायक पं. कौशिक ऐताल (बंगळुरू) यांचे शास्त्रीय गायन असेल. विविध रागदर्शनासह मनोवेधक प्रस्तुती देत पं.ऐताल रसिकांना अनुपम श्रवणानुभूती देणार आहेत. पनवेलकर संगीतप्रेमींसाठी ही एक महत्त्वाची सांस्कृतिक पर्वणी ठरणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन वीणा कुलकर्णी (डॉ. प्रभा अत्रे यांच्या शिष्या व रामचंद्र गुंडो देसाई यांची कन्या) यांनी केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आरती नायर करतील.

# पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्पादन शुल्क, परिवहन, वाहतूक विभागाची बैठक

## आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सूचना



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व शांततेत पार पडावी यासाठी आज दिनांक २६ डिसेंबर महापालिका मुख्यालयात उत्पादन शुल्क, परिवहन विभाग व वाहतूक विभागाची बैठक घेण्यात आली. निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आलेल्या या बैठकित तीनही विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आदर्श आचारसंहिताचे पालन करताना निवडणूक रॅली, प्रचार मिरवणुकीदरम्यान वाहनांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याविषयीच्या सूचना परिवहन विभागास देण्यात आल्या. प्रचार रॅलीचे मार्गाविषयी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांशी चर्चा करून माहिती करून घेणे, वाहनांच्या कागदपत्रांची तपासणी करणे, तपासणी नाक्यावरती संशयास्पद वाहनांची असून चौकशी करण्याबाबत या बैठकीत सूचना देण्यात आल्या.

उत्पादन शुल्क विभागास भरारी पथकांच्या साह्याने चेकपोस्ट नाक्यांवरती बनावट दारू, अवैध वस्तू यांच्यावर कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. पथकांच्या साह्याने आदर्श आचारसंहिताचे पालन करताना विविध तक्रारींचे तात्काळ निवारण करण्याविषयी सूचना दिल्या. तसेच प्रभाग निहाय भरारी पथकाच्या माध्यमातून कारवाई करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

पोलीस वाहतूक विभागास सूचना देताना सहा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाजवळील वाहतूक कोंडीची ठिकाणे शोधून वाहतूक कोंडी होणार नाही यादृष्टीने बॅरिकेटिंग करणे, पार्किंगचे नियोजन करण्याविषयक सूचना देण्यात आल्या. सर्व विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांना एकमेकांच्या संपर्कात राहून नियोजनपूर्वक काम करण्याविषयी सांगितले. एक खिडकी योजनेबाबत माहिती देताना शासनाच्या संबंधित विभागाच्या प्रत्येकी एका प्रतिनिधीने प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत सूचना दिल्या.

निवडणूकविषयक सर्व कामे जसे की सर्व प्रकारची माहिती, परवाना देणे, प्रमाणपत्र तात्काळ एक खिडकीच्या माध्यमातून देण्याविषयीच्या सूचना या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी यावेळी उपस्थित संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन व सूचना दिल्या.

# पनवेल मनपा क्षेत्रात मतदान जनजागृतीसाठी पथनाट्य

## खारघर, कळंबोलीत सादरीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी जास्तीत जास्त वाढविण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार स्वीप कार्यक्रमाद्वारे मोठ्या प्रमाणावर मतदान जनजागृती केली जात आहे.

याचाच एक भाग म्हणून पथनाट्यांचे आयोजन मोठ्या प्रमाणावर केले जात असून गेल्या दोन दिवसांपासून कळंबोली व खारघर प्रभागात विविध १६ ठिकाणी पथनाट्याच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्यात आली.

महापालिकेच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत महापालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

नागरिकांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून खारघर, कळंबोली, कामोठे व पनवेल या चारही प्रभागांमध्ये विविध ठिकाणी पथनाट्य सादर केले जात आहेत. यामध्ये खारघर येथे २५ डिसेंबर रोजी पथनाट्यांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच कळंबोली येथे २६ डिसेंबर रोजी सादर करण्यात आली.



# तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये तीन कारखान्यांना भीषण आग

**पनवेल : वार्ताहर**



तळोजा औद्योगिक वसाहतीत भीषण आगीची घटना घडली. येथील तळोजा औद्योगिक वसाहतमधील तीन कारखान्यांना एकाच वेळी आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. रात्री साडेनऊच्या सुमारास लागलेली ही आग पहाटे साडेपाच वाजेपर्यंत आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाला शर्थीचे प्रयत्न करावे लागले. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी कारखान्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक बी–४२ वरील विघ्नहर्ता कंपनीमध्ये अगरबत्ती निर्मितीसाठी वापरल्या जाणार्या रसायनांची सुमारे १५० पिंपे साठवण्यात आली होती. या पिंपांमधील सॉल्व्हन्ट रसायनांनी अचानक पेट घेतल्याने भीषण स्फोट झाले आणि आगीने उग्र स्वरूप धारण केले. स्फोटाच्या तीव्रतेमुळे कारखान्यातील लोखंडी पत्रे तुटून थेट रस्त्यावर कोसळली. उडालेल्या रसायनांमुळे कंपनीसमोरील रस्ता व गटारांमधून आग पसरत गेली आणि लगतच्या आणखी बी –४१ आणि बी –४३ या दोन कारखान्यांनाही तिचा फटका बसला.

आगीचे लोण वाढत असल्याचे लक्षात येताच कारखान्यातील कामगारांनी प्रसंगावधान राखत तात्काळ बाहेर पळ काढला आणि आपले प्राण वाचवले. तळोजा एमआयडीसी अग्निशमन दलाचे अधिकारी रत्नाकर पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार रात्री सव्वा दहा वाजता आगीची माहिती मिळताच वाहतूक कोंडी असूनही अवघ्या पाच मिनिटांत अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. आगीची तीव्रता पाहता अतिरिक्त बंब मागवण्यात आले. पहाटेपर्यंत सतत पाणी व फोमचा मारा करून अखेर आग नियंत्रणात आणण्यात यश आले. मात्र, रसायनांनी पेट घेतल्यामुळे आग अधिक पसरली असली तरी तिचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेनंतर औद्योगिक वसाहतीतील सुरक्षा व्यवस्था व रसायन साठवणीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# दर्जेदार शिक्षणासाठी शाळेची वास्तूदेखील तितकीच दर्जेदार असावी लागते –अरुणशेठ भगत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येणाऱ्या पिढीने प्रगती करायची असेल तर त्यांना दर्जेदार शिक्षण मिळणे अत्यंत गरजेचे आहे आणि अशा शिक्षणासाठी शाळेची वास्तू देखील तितकीच दर्जेदार असावी लागते.आणि अशी वस्तू मुंबई ऊर्जा लिमिटेड कंपनीच्या माध्यमातून उभी राहणार आहे. याबद्दल भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी कंपनीचे आभार मानले तसेच आपल्या गावाचा आणि परिसराचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर सर्वांनी एकत्रितरीत्या काम करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन केले.



पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नातून आणि मुंबई ऊर्जा मार्ग लिमिटेड यांच्या ५० लाख रुपयांच्या सीएसआर फंडातून चिंध्रण येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम केले जाणार आहे.

या कामाचे भूमिपूजन शुक्रवारी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी शाळेच्या कामासाठी पुढाकार घेतल्याबद्दल सुर्या कंपनीचे विशेष आभार मानले.

या कामाच्या भूमिपूजनावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, भाजप नेते एकनाथ देशकर, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी सरपंच कमला देशेकर, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, उत्तर मंडळ सरचिटणीस अंकुश पाटील, रमेश कोटणी, माजी नगरसेविका अरुणा दाभणे, सरपंच एकनाथ पाटील, माजी सरपंच रघुनाथ फराड, शिवाजी दुर्गे, प्रकाश खैरे, अरविंद गोंधळी, धनाजी पाटील, अंकुश पाटील, अशोक साळुंखे, धनंजय पाटील, लक्ष्मण पाटील, महेश पाटील, रविंद्र पाटील, बाळकृष्ण पाटील, निवृत्ती पाटील, नंदकुमार भोपी, रुपेश पावशे, सीबी पाटील, हरिचंद्र गोंधळी, माजी उपसरपंच गणपत देशेकर, वलप गाव अध्यक्ष प्रभाकर पाटील, वावंजे पंचायत समिती अध्यक्ष प्रकाश खैरे, डॉ. संतोष आगलावे, गणपत कडू, अनंता कडू, नरेश सोनावले, दिनेश पाडेकर, शंकर देशेकर, अभिमन्यू पाटील, राजेंद्र पाटील, शांताराम कुंभारकर, ग्रामपंचायत सदस्य संतोष देशेकर, मनोज कुंभारकर, कुसुम पाटील, जीवन पाडेकर, सुरेश पाटील, चंद्रकांत पाटील, लहुशेठ पाटील, कोंडीराम पाटील, काळुराम घोडिंदे, मोतीराम टेंबे, रामदास पाटील, हिरामण पाटील, हरिश्चंद्र पाटील, बाबूशेठ मुंबईकर, रुपेश मुंबईकर, सुरेश मुंबईकर, बाळकृष्ण पाटील, नासीर शेख, नंदू भोपी, सागर सांगडे, प्रकाश खाडेकर, किरण पाटील, युवराज पाटील, जीवन पाटील, सोपान खाडेकर, मुख्याध्यापक हंबीर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# फुंडे विद्यालयात वीर बाल दिन



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत वीर बाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हा दिवस गुरु गोविंद सिंग यांच्या दोन लहान मुलांनी दिलेल्या बलिदानाचे प्रतिक म्हणून साजरा केला जातो.

शीख इतिहासातील अद्वितीय शौर्य, बलिदान आणि नीतिमत्तेचे प्रतिक असलेल्या साहिबजादा जोरावर सिंग व साहेबजादा फतेह सिंग यांच्या आदम्य धैर्याच्या स्मरणार्थ साजरा करण्यात येतो या दोन्ही वीर बालकांनी अल्पवयातच धर्म, सत्य आणि स्वाभिमानासाठी सर्वोच्च बलिदान दिले. सदर देशव्यापी उत्सव किशोरवयिन विद्यार्थ्यांचे मनोसंवर्धन करणे त्यांची सर्जनशीलता वाढवणे आणि त्यांना विकसित भारताच्या दृष्टिकोनात योगदान देण्यासाठी प्रेरणा देणे हा मुख्य उद्देश आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय स्तरावर वीर बाल दिवसाचे नवी दिल्ली येथे जे आयोजन केले होते त्याचे थेट प्रक्षेपण सर्व विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. या वेळी वक्तृत्व, निबंध, कविता चित्रकला व कथाकथन या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आर.जी. शेळके, एन.के. पाटील, एम.आर. पाटील, उपशिक्षिका एस.एस म्हात्रे यांचे सहकार्य लाभले.

# डेबिट कार्डद्वारे फसवणूक; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

डेबिट कार्डद्वारे ८४ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.शशिकांत सोनवणे बँकेच्या एटीएम सेंटरमध्ये रक्कम काढण्यासाठी गेले.त्यांनी एटीएम मशीनमध्ये टाकून पासवर्ड टाकला. मात्र रक्कम आली नाही. यावेळी सेंटरच्या बाहेर उभा असणारा एक इसम एटीएम सेंटरमध्ये आला आणि तुमचे पैसे निघत नाहीत का तुम्ही दुसरे कार्ड टाका असे बोलला. यावेळी सोनवणे यांनी दुसरे डेबिट कार्ड एटीएम मशीनमध्ये टाकून पासवर्ड टाकला. तरी देखील पैसे आले नाहीत.

यावेळी त्या इसमाने तुमची स्लिप खाली पडली असे सांगितले. त्यांनी स्लिप उचलली आणि डेबिट कार्ड घेऊन घरी आले. रात्रीच्या सुमारास त्यांना त्यांच्या बँक खात्यातून ८४ हजार रुपये वजा झाल्याचे मेसेज आला. अनोळखी इसमाने हातचलाखीने त्यांचे कार्ड तो घेऊन त्याद्वारे ८४ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे त्यांच्या लक्षात आले.



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) ज्युनिअर कॉलेजचे प्रभारी प्राचार्य प्रशांत मोरे यांना संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. या वेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, सदस्य राहुल घरत, सीकेटी प्राथमिक विद्यालयाचे उपमुख्याध्यापक सुभाष मानकर उपस्थित होते.**

# सीकेटी मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे, चांगू काना ठाकूर मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयाचे ३० वे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा माय मराठी या शीर्षकांतर्गत २५ डिसेंबर रोजी मोठ्या आनंदात आणि उत्साहातसाजरा झाला.



या सोहळ्याला प्रमुख अतिथी गटशिक्षणाधिकारी शाहू सतपाल, आयकर विभाग, मुंबईचे उपायुक्त डॉ. परमानंद दराडे उपस्थित होते. हा सोहळा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळ सदस्य वर्षा ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. विशेष अतिथी म्हणून कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, पंचायत समितीचेशालेय पोषण आहार अधीक्षक नवनाथ साबळे, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, राहुल घरत उपस्थित होते.

या वेळीप्रमुख अतिथी व मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले, तर शाहू सतपाल आणि डॉ. परमानंद दराडे यांनी आपल्या मनोगतातून शाळेची होत असणारी प्रगती, शिक्षकांचे अमूल्य मार्गदर्शन तसेच मराठी माध्यमातून शिक्षण घेणे किती महत्त्वाचे आहे हे आवर्जून सांगितले. वर्षा ठाकूर यांनी विद्यालयाच्या प्रगतीचा आलेख कसा उंचावत आहे अ याची पालकांना व उपस्थितांना माहिती करून दिली.

या सोहळ्यामध्ये मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी 'माय मराठी' या शीर्षकाखाली मराठी भाषेतील शिक्षणाचे महत्त्व व मराठी भाषेचे महत्व बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमातून सादर करून रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यावेळीमुख्याध्यापक सुभाष मानकर, सहाय्यक शिक्षक पंढरीनाथ जाधव, संगीत शिक्षिका अर्चना पाटील यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## संपादकीय

# मुलांसाठी बंदी हवी?

समाज माध्यमांच्या दुष्प्रभावापासून लहान मुलांना व किशोरवयीनांना दूर ठेवण्यासाठी सरकारी पातळीवरून जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो आहेच, परंतु तेवढेच पुरेसे नाही. त्यामुळे न कळत्या वयात या मुलांचे सोशल मीडियाच्या आहारी जाणे रोखण्यासाठी आपल्याकडेही ऑस्ट्रेलियाप्रमाणे १६ वर्षांखालील मुलांच्या समाज माध्यमांच्या वापरावर कायद्याने बंदी घालता येईल का याचा विचार व्हावा अशी शिफारस मद्रास उच्च न्यायालयाने नुकतीच केली आहे. ही समस्या हळूहळू गंभीर स्वरूप धारण करत चालली असल्याने ठोस उपाययोजनेची गरज नक्कीच आहे.

**लहान मुले आणि किशोरवयीन मुलांवर समाज माध्यमांच्या वापराचा होणारा अनिष्ट परिणाम याबद्दल जगभरातच चिंता व्यक्त केली जाते आहे. समाज माध्यमांच्या वापरामुळे मुलांचा मोठ्यांच्या जगात खूपच न कळत्या वयात प्रवेश होतो. पुरेशी समज नसतानाच ते अनेक गोष्टी पाहतात. यात पॉर्न अर्थात लैंगिक सामग्रीचाही समावेश आहे. याचा त्यांच्या भावनिक आयुष्यावर तसेच एकंदर मानसिकतेवर मोठा परिणाम होतो. समाज माध्यमांवर काही दुष्प्रवृत्ती सॉफ्ट टार्गेट शोधतच असतात. लहान मुले वा किशोरवयीन या दुष्प्रवृत्तींच्या जाळ्यात सहज अडकू शकतात. एखाद्या खेळामार्फत किंबहुना निव्वळ संवादातून या दुष्प्रवृत्ती मुलांच्या मानसिकतेचा ताबा घेऊ शकतात व त्यांचे लैंगिक शोषण करू शकतात. त्यांना नैराश्याच्या गर्तेत ढकलून कुठल्याही टोकाच्या कृती करायला भाग पाडू शकतात असे जगभरात काही प्रकरणांतून आढळले आहे. टोकाचे काही घडले नाही तरी मैदानी खेळ, वाचन, अभ्यास यांपासून समाजमाध्यमे मुलांना दूर नेतात. यामुळे मुलांमध्ये आक्रमकता वाढते. ती हट्टी, दुराग्रही बनतात. यामुळेच ऑस्टेलियाने अलीकडेच १६ वर्षांखालील मुलांना समाज माध्यमे वापरण्यावर बंदी आणल्याची घोषणा केली. जगभरात या निर्णयाची चर्चा होते आहे. मद्रास उच्च न्यायालयाने आता केंद्र सरकारचे या निर्णयाकडे लक्ष वेधले असून आपल्या देशातही १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी आणणारा कायदा करता येईल का हे तपासण्याची शिफारस केली आहे. कोविडपासून सर्व स्तरांतील घरांत मुलांच्या हातात फोन आला आहे. दोन्ही पालक नोकरी करणारे असतील तर संवादाची सुरक्षितता म्हणून मुलांना मोबाइल दिला जातो. परंतु स्मार्ट फोनमुळे वापर निव्वळ कॉलपुरता मर्यादित राहात नाही. शाळकरी मुलेही आईवडिलांच्या नकळत समाजमाध्यमांवर येतात. खालच्या स्तरात तर पालकांपेक्षा मुलांनाच या गोष्टी सहज वापरता येत असल्यामुळे पालकांच्या नियंत्रणाचा प्रश्नच उद्भवत नाही. सुशिक्षित पालकही यासंदर्भात हतबलताच अनुभवतात. पालकांना आपले नियंत्रण गेल्याची जाणीव अस्वस्थ करते. मूल फोनच्या नको इतके आहारी गेले आहे. त्यामुळे कमालीचे हट्टी बनले आहे. त्याला मोबाइलचे व्यसन जडले आहे. त्यावर आता उपाय काय या प्रश्नाशी अनेक पालक झगडत असतात. यातून कौन्सिलिंग व थेरपीने सुटका होऊ शकते. परंतु हा पर्याय नक्कीच स्वस्त नाही. तसेच महानगरे वगळता सगळीकडे त्याची उपलब्धताही नाही. अशावेळी मुलांना कायद्यानेच समाजमाध्यमांपासून दूर ठेवले तर नक्कीच काही प्रमाणात या समस्येवर नियंत्रण मिळवता येऊ शकेल. काही देशांमध्ये अशा बंदीऐवजी या समाजमाध्यमांवरच पालकांना नियंत्रण ठेवण्याचा वा लक्ष ठेवता येण्याचा पर्याय उपलब्ध व्हायला हवा अशीही मागणी होते आहे. लक्ष विचलित करणाऱ्या समाजमाध्यमांच्या आहारी जाण्यापासून मुलांना रोखले पाहिजे याविषयी मात्र कुणाचेच दुमत असणार नाही.**

# महसूली शब्दांचे अर्थ जाणून घेऊया..!




महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा म्हणून ओळखला जातो. महसूल विभागाच्या सेवा प्रभावीपणे व पारदर्शकरित्या नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कामकाजात ई-प्रणालीचा वापर होत आहे. सातबारा उतारा, फेरफार नोंद, विविध परवानग्या, शासकीय जमीनीचे व्यवस्थापन, शस्त्र परवाना, कर वसुली, नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत व पुनर्वसन कार्य या विभागामार्फत चालते. महसूल विभाग हा नागरिकांचा जिव्हाळ्याचा विभाग असला तरी यातील काही शब्दांचे अर्थ समजून घेताना क्लिष्ट वाटतात. या लेखाच्या माध्यमातून विभागाशी संबंधित कामाशी निगडीत अशाच काही शब्दांचे अर्थ जाणून घेऊया...

**निस्तारपत्रक**

निस्तारपत्रक म्हणजे गावातील सर्व सार्वजनिक जमिनींच्या वापराबाबतचा अधिकृत नकाशा व नियमांची यादी. गावात ज्या जमिनी वैयक्तिक मालकीच्या नसतात जसे की तलाव, रस्ते, नदीकाठची जमीन, स्मशानभूमी, चराई जमीन, सार्वजनिक जागा त्या जमिनींचा कशासाठी आणि कसा वापर करायचा याची संपूर्ण योजना या पत्रकात दिलेली असते.

**निहित**

निहित म्हणजे जमीन किंवा मालमत्ता एखाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला वापरासाठी देणे, परंतु मालकी हक्क न देणे. ज्या व्यक्तीकडे जमीन निहित केली जाते, त्याची स्थिती कनिष्ठ धारकासारखी असते. म्हणजेच तो जमीन फक्त दिलेल्या मर्यादेत वापरु शकतो.जमीन ज्या विशिष्ट कारणासाठी निहित केली आहे ते काम किंवा उद्देश शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येत नाही.

**निखात निधी**

निखात निधी अर्थात जमिनीखाली लपलेला किंवा दडलेला मौल्यवान खजिना जसे की दागिने, सोने- चांदीची नाणी किंवा रुपये किंवा मौल्यवान वस्तू. जमीन नांगरताना, खोदताना किंवा काम करताना असा मौल्यवान खजिना सापडता तर भारतीय निखात निधी कायदा १८७८ नुसार सरकारला कळविणे तसेच पुढील प्रक्रिया करणे आवश्यक असते.

**कनकूत**

कनकूत म्हणजे शेतातील उभ्या पिकाच्या उत्पादनाचा अंदाज लावण्याची महसूली पद्धत. यामध्ये पिकाची वाढ, दाण्यांची संख्या आणि पिकाची एकूण घनता यासारख्या घटकांचा विचार करुन कापणीनंतर किती उत्पादन मिळेल याचा अंदाज घेतला जातो.

**जिन्नसवार**

जिन्नसवार म्हणजे गावात घेतल्या जाणाऱ्या मुख्य पिकांची अधिकृत नोंद. गावात कोणती पिके जास्त प्रमाणात घेतली जातात, कोणते पीक त्या भागाचे प्रमुख उत्पादन मानले जाते, याची माहिती या यादीत असते. ही नोंद महसूल नोंदीसाठी उपयुक्त ठरते.

**वरसाल**

एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यावर किंवा त्याने मृत्यूपत्र लिहून ठेवले असल्यास, त्या आधारावर मालमत्तेची नावात होणारी बदल नोंद म्हणजे वरसाल.

**पारडी जमीन**

पारडी जमीन म्हणजे गावठाणातील घरांच्या लगत किंवा सभोवती असलेली, शेतीयोग्य पण मुख्यत: घराशी संबंधित वापरात येणारी लागवडीची जमीन.


**स्वामित्वधन**

जमिनीचा पृष्ठभाग कोणच्याही मालकीचा असला तरी त्याखालील खनिजे शासनाच्या मालकीची असतात. कोणत्याही व्यक्तीस अशा खनिजाचे उत्खनन करुन त्याचा उपयोग करावयाचा असल्यास त्यास त्या खनिजांचे स्वामित्वधन (रॉयल्टी) शासनास द्यावे लागते. तसेच त्यावर स्थानिक उपकरही भरावे लागतात.

***संकलन :** विभागीय माहिती कार्यालय, पुणे*

# रसायन व जीवशास्त्रज्ञ लुई पाश्चर

२७ डिसेंबर १८२२ रोजी जन्मलेले फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ आणि जीवशास्त्रज्ञ लुई पाश्चर यांनी निसर्गातील सूक्ष्मजीवसृष्टीकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन दिला. गरीब चर्मकार कुटुंबात जन्मलेल्या पाश्चर यांना लहानपणी शिक्षणापेक्षा मासेमारी व चित्रकला यात विशेष रस होता. इ.स.१८४७मध्ये डॉक्टरेट संपादन केल्यावर स्टॉसबर्ग विद्यापीठात त्यांची प्राध्यापकपदावर नियुक्ती झाली. त्यांचे सुरवातीचे संशोधन रसायनशास्त्रात होते.



टार्टारिक आम्लाच्या रेणूंचा अभ्यास करताना त्यांच्या लक्षात आले की नैसर्गिक आणि कृत्रिमरीत्या तयार केलेल्या टार्टारिक आम्लाचे भौतिक आणि रासायनिक गुणधर्म एकसारखे असले तरी त्याची ध्रुवीकृत प्रकाशाची दिशा बदलण्याची क्षमता वेगळी असते. या आम्लाच्या स्फटिकांचा सखोल अभ्यास करून पाश्चर यांनी आण्विक विषमतेचे अस्तित्व शोधले. यालाच आज स्टीरिओकेमिस्ट्रीचा पाया मानला जातो.

१८५४मध्ये लिले विद्यापीठात विज्ञान शाखेचे डीन म्हणून नियुक्त झाले असताना, त्यांना स्थानिक डिस्टिलरीमध्ये अल्कोहोल उत्पादनाशी संबंधित समस्या सोडवण्यास मदत करण्यास सांगितले गेले. त्यासाठी त्यांनी अल्कोहोलिक किण्वन प्रक्रियेवर अभ्यास सुरू केला आणि त्या प्रक्रियांमध्ये जीवांचा सहभाग असल्याचे प्रायोगिक पुरावे सादर केले. तसेच विविध किण्वन प्रक्रियेत त्यांचे विशिष्ट जीव संबंधित असल्याचे दर्शविले. यातूनच पुढे जैवतंत्रज्ञानाचा उगम झाला.

इ.स.१८६३मध्ये फ्रान्सचे सम्राट नेपोलियन-तिसरे यांच्या विनंतीनुसार पाश्चर यांनी वाइन दूषित का होते, याचा अभ्यास केला. इतर अनावश्यक सूक्ष्मजीवांमुळे दूषित होण्यापासून रोखण्यासाठी, पाश्चर यांनी वाइन ६० अंश ते १०० अंश सेल्सिअस तापमानाला ३० मिनिटे गरम करण्याची प्रक्रिया वापरली. यालाच पाश्चरायझेशन असे संबोधतात. आज जगभरात अनेक पदार्थ, पेये व दुधाचे दीर्घकाळ जतन करण्यासाठी पाश्चरायझेशनचा वापर केला जातो.

इ.स.१८४९च्या सुमारास फ्रान्समध्ये रेशमाच्या किडय़ावर रोगाची लागण होऊन संपूर्ण युरोपातील रेशीमउद्योगाचे मोठय़ा प्रमाणावर नुकसान होऊ लागले होते. त्यावर पाश्चर यांनी अखेर इ.स.१८६७मध्ये अळय़ांची दूषित झालेली अंडी नष्ट करून निरोगी अंडय़ांपासून अळय़ा तयार करण्यात यश मिळवले व रोगावर नियंत्रण झाले.

पाश्चर यांनी प्राण्यांच्या व माणसांच्या अनेक प्राणघातक रोगांना कारक असलेले जंतू व त्यांचा परस्परसंबंध प्रथमच सिद्ध केला. यातूनच विज्ञानाला कलाटणी देणारा जंतू-सिद्धांत उदयाला आला. त्यांनी लसनिर्मितीचे शास्त्र विकसित केले. सर्वप्रथम कोंबडय़ा व नंतर माणसांसाठी अँथ्रॅक्स, रेबीज, कॉलरा, घटसर्प, क्षय, देवी यावर रोगप्रतिबंधक लसी तयार केल्या.

इ.स.१८८७मध्ये त्यांनी पाश्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. अनेक रोगांवरील उपचार व प्रतिबंधाच्या क्षेत्रात आजही पॅरीसमधील ही संस्था अव्वल दर्जाची मानली जाते.

**-डॉ. अपर्णा दुभाषी**



## बदलते तंत्रज्ञान

# नवीन वर्षात रिचार्ज प्लॅन २० टक्क्यांपर्यंत होणार महाग

देशभरातील मोबाईल वापरकर्त्यांच्या खिशाला येत्या नवीन वर्षात कात्री बसणार आहे, कारण २०२६मध्ये मोबाईल रिचार्ज प्लॅन पुन्हा एकदा महाग होऊ शकतात. रिपोर्ट्सनुसार रिलायन्स जिओ, एअरटेल आणि व्होडाफोन आयडिया त्यांच्या प्रीपेड आणि पोस्टपेड प्लॅनच्या किमती २० टक्क्यांपर्यंत वाढवू शकतात. अनेक निवडक प्लॅनमधील टॅरिफ वाढीची माहिती कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना सादर करण्यात आली आहे.




मॉर्गन स्टॅनली या संशोधन संस्थेच्या अहवालानुसार भारतीय दूरसंचार कंपन्या २०२६मध्ये त्यांचे दर १६ ते २० टक्क्यांनी वाढवू शकतात. याचा उद्देश कंपन्यांचा प्रति वापरकर्ता सरासरी महसूल वाढवणे आहे. शेवटचा दरवाढ जुलै २०२४ मध्ये झाला होता आणि आता दोन वर्षांनंतर किमती पुन्हा वाढणार आहेत.

एक्सवर वापरकर्ता क्रांती कुमार यांनी शेअर केलेल्या अंदाजानुसार एअरटेलचा २८ दिवसांचा अमर्यादित ५जी प्लॅन ३१९ रुपयांवरून ४१९ रुपयांपर्यंत वाढू शकतो. दरम्यान, जिओचा २९९ रुपयांचा १.५ जीबी दैनिक डेटा असलेला प्लॅन ३५९ रुपयांपर्यंत पोहोचू शकतो. शिवाय ३४९ रुपयांचा २८ दिवसांचा ५जी प्लॅन ४२९ रुपयांपर्यंत वाढू शकतो. याचा अर्थ वापरकर्त्यांना दरमहा ८० ते १०० रुपये जास्त खर्च करावे लागू शकतात.

व्होडाफोन आयडिया वापरकर्त्यांनाही कोणताही दिलासा मिळणार नाही. अहवालानुसार Viचा २८ दिवसांचा १ जीबी दैनिक डेटा प्लॅन ३४० रुपयांवरून ४१९ रुपयांपर्यंत वाढू शकतो. तर ५६ दिवसांच्या वैधतेसह २ जीबी दैनिक डेटा प्लॅन ५७९ रुपयांवरून ६९९ रुपयांपर्यंत वाढू शकतो. यावरून स्पष्ट होते की Viच्या मध्यम श्रेणीच्या प्लॅनवरही या दरवाढीचा पूर्णपणे परिणाम होईल.

टेलिकॉम कंपन्या नेहमीच प्लॅनच्या किमती थेट वाढवत नाहीत. कधीकधी त्या प्लॅनची वैधता कमी करतात किंवा देण्यात येणारे फायदे कमी करतात. अलीकडेच, जिओ, एअरटेल, व्हीआय आणि अगदी बीएसएनएलने त्यांच्या अनेक प्रीपेड प्लॅनची वैधता आणि फायदे बदलले आहेत. यामुळे वापरकर्त्यांना तेच फायदे मिळविण्यासाठी वारंवार रिचार्ज करावे लागत आहे, ज्यामुळे त्यांचा एकूण खर्च वाढतो.

# पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख

देशाचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख ('भाऊसाहेब') यांची आज १२४वी जयंती... आज आपल्या देशाच्या कृषी क्षेत्रातील भरारीचा भक्कम पाया भाऊसाहेबांच्या कृषी धोरण आणि विचारांमुळे घातला गेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शेती आणि कृषी क्षेत्राला नवा आकार देणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्राबरोबरच शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान राहिले आहे. त्यातूनच राज्यातील एक अग्रगण्य समजल्या अमरावती येथील श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचा पाया भाऊसाहेबांनी घातला. १० एप्रिल १९६५ रोजी भाऊसाहेबांचे निधन झाले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून पुढे महाराष्ट्र सरकारने २० ऑक्टोबर १९६९ रोजी त्याच्या नावाने अकोला येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची स्थापना केलीय.

देशाच्या सध्याच्या कृषी क्षेत्राच्या प्रगतीत देशाचे प्रथम कृषिमंत्री 'भाऊसाहेब' डॉ. पंजाबराव देशमुख यांचा सिंहाचा वाटा आणि मोलाचे स्थान आहेय. शेती आणि मातीशी असलेले घट्ट नाते आणि या क्षेत्राचा भाऊसाहेबांना सूक्ष्म अभ्यास होतं. हीच गोष्ट लक्षात घेत देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्य भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून डॉ.पंजाबराव देशमुख यांची निवड केली होती. भाऊसाहेबांचा



## निमित्त

जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्ह्यातील सध्याच्या नांदगाव खंडेश्वर तालुक्यातल्या पापळ या गावी झाला. डॉ. पंजाराव देशमुख यांचे वडील शामराव देशमुख हे हाडाचे शेतकरी. त्यामुळेच बालपणापासून पंजाबरावांना शेतीविषयी विशेष प्रेम. प्राथमिक शिक्षण गावात घेतल्यानंतर ते पुढे माध्यमिक शिक्षणसाठी कारंजा लाड आणि अमरावतीत येथे गेले. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेज येथून पूर्ण केलेयट. पुढे १९२१ मध्ये इंग्लंडच्या जगप्रसिद्ध केम्ब्रीज विद्यापीठातून बॅरिस्टर पदवी उत्तीर्ण केली. येथेच त्यांनी संस्कृतमध्ये एमए आणि पीएचडीची पदवी घेतली. त्यांना देशातील सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांचा कळवळा होता. त्यातूनच त्यांनी आपले पुढचे जीवन देशातील जनतेला समर्पित केले. १९३०मध्ये ते प्रांतीय कायदेमंडळाचे सदस्य म्हणून निवडून आलेत. ते यात शिक्षण मंत्री, कृषी व सहकार विभागाचे मंत्री बनले होते. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या विकास समितीचे सदस्य झालेत. १९५२, १९५७ आणि १९६२ असे सलग तीन टर्म्स ते खासदार म्हणून निवडून आलेत. तसेच ते १९५२ ते १९६२ असे दहा वर्ष ते देशाचे कृषीमंत्री होते. त्यांनी गरीब विद्यार्थ्यांसाठी श्रद्धानंद वसतिगृह सुरू केले. त्यांनी प्रसिद्ध श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज या संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालय,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्पृश्य निवारण चळवळीत भाऊसाहेबांनी त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले. यातूनच अमरावतीच्या आंबा मंदिरात दलितांना प्रवेश मिळविण्यासाठी त्यांनी सत्याग्रह केला होता. शेतकरी स्थिती सुधारणा करण्यासाठी त्यांनी भारत कृषक समाज या संस्थेची स्थापन केली. त्यांनी समाजाचा अधिवक्ता असण्याचं धोरण राबविण्यासाठी महाराष्ट्र केसरी हे वृत्तपत्र सुरू केले. डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांनी ७ फेब्रुवारी १९५५ रोजी भारत कृषक समाजाची स्थापना करून संपूर्ण शेतकरी समाजाला राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ निर्माण करून दिले. (साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा




## आरोग्य प्रहर

# व्हिटॅमिन डी मिळण्यासाठी आहारात 'या' गोष्टी खा

व्हिटॅमिन डी सर्वोत्तम स्त्रोत: व्हिटॅमिन डी हे एक पोषक तत्व आहे जे आपली हाडे, स्नायू, प्रतिकारशक्ती आणि मनःस्थिती संतुलित करते. जर त्याची कमतरता असेल तर थकवा, वेदना, झोपेचा त्रास, केस गळणे, प्रतिकारशक्ती कमकुवत होणे आणि हाडे देखील दीर्घकाळापर्यंत कमकुवत होऊ शकतात. अभ्यासानुसार, शहरात राहणारे सुमारे ८०% लोक त्याच्या कमतरतेशी झगडत आहेत, जे लोक दिवसभर उन्हात राहतात ते देखील याचा पूर्ण फायदा घेऊ शकत नाहीत आणि दैनंदिन आहारात त्याचे प्रमाण जवळजवळ नगण्य आहे. अशा परिस्थितीत, प्रश्न उद्भवतो की आपण दररोज १००% व्हिटॅमिन डी मिळवू शकता, यासाठी सूर्यप्रकाश पुरेसा आहे की त्यास अन्न-पूरक आहाराचीदेखील आवश्यकता आहे. चला जाणून घेऊया.




उन्हात वेळ घालवा व्हिटॅमिन डीला सनशाईन व्हिटॅमिन म्हणतात. सूर्यप्रकाश आपल्या त्वचेला थेट व्हिटॅमिन डी तयार करण्यास मदत करतो. तज्ज्ञांच्या मते, हलकी त्वचा असणाऱ्यांनी १० ते १५ मिनिटे, गडद त्वचेच्या लोकांनी २० ते ३० मिनिटे उन्हात घालवली पाहिजेत.

चरबीयुक्त मासे आणि सीफूड जर तुम्ही नॉन-व्हेज खात असाल तर फॅटी फिश आणि सीफूड तुमच्यासाठी सर्वोत्तम असू शकते. बहुतेक व्हिटॅमिन डी सॅल्मन, ट्यूना, मॅकेरल, सार्डिन आणि कोळंबी यासारख्या माशांमध्ये आढळते. फक्त १०० ग्रॅम सॅल्मनमध्ये ५०० आययूपेक्षा जास्त व्हिटॅमिन डी असते. म्हणजेच ते १००% गरज पूर्ण करू शकतात. चरबीयुक्त मासे आणि सीफूड व्हिटॅमिन डीच्या सर्वोत्तम नैसर्गिक स्त्रोतांपैकी एक आहेत. सॅल्मनचा ३-औंस डोस जास्तीत जास्त १०० ग्रॅम पर्यंत फायदा देऊ शकतो. मशरूम मशरूम हे एकमेव शाकाहारी अन्न आहे ज्यामध्ये नैसर्गिकरित्या व्हिटॅमिन डी असते. अतिनील उपचारित मशरूममधील व्हिटॅमिन डी अनेक पटींनी वाढते. आठवड्यातून ४ वेळा ७०-८० ग्रॅम मशरूम खाल्ल्याने व्हिटॅमिन डीची चांगली मात्रा मिळते. अंडी जर आपण अंडी खाल्ली तर दररोज १-२ अंडी अंड्यातील पिवळ बलक देखील भरपूर व्हिटॅमिन डी प्रदान करते. एका अंड्यामध्ये व्हिटॅमिन डीचे सुमारे ४०-४५ आययू असते. याशिवाय जगभरातील अनेक पदार्थांमध्ये व्हिटॅमिन डी जोडला जातो. भारतात सामान्यत: व्हिटॅमिन डी समृद्ध असलेल्या पदार्थांमध्ये फोर्टिफाइड दूध, सोया-बदाम-ओट दूध, दही, संत्राचा रस, न्याहारी तृणधान्ये आणि टोफू यांचा समावेश आहे.

# आंबेनळी घाटातून कार दरीत कोसळली; पाच जण जखमी

**पोलादपूर : रामप्रहर वृत्त**

आंबेनळी घाटात गुरूवारी (दि.२५) सकाळच्या सुमारास भीषण अपघाताची घटना घडली. कार सुमारे १०० फूट खोल दरीत कोसळली. वळणदार रस्ता आणि तीव्र उताराच्या भागात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या अपघातात गाडीतील एकूण पाच जणांपैकी दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांना तत्काळ ग्रामीण रुग्णालय महाबळेश्वर येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे.



## मुलाच्या कॉलमुळे बचावकार्याला वेग

अपघातानंतर गाडीमध्येच असलेल्या दहा वर्षीय मुलाने प्रसंगावधान राखत ११२ या आपत्कालीन क्रमांकावर फोन करून अपघाताची माहिती दिली. मात्र, फोनवर लहान मुलाचा आवाज असल्याने सुरुवातीला अपघात बसचा झाला की काय, असा संभ्रम निर्माण झाला. तसेच अपघाताचे नेमके ठिकाण स्पष्ट न समजल्यामुळे शोधकार्याला उशीर झाला. अपघातस्थळ शोधण्यापासूनच मदतकार्याला सुरुवात करावी लागली. अखेर अथक प्रयत्नांनंतर घटनास्थळ निश्चित झाल्यानंतर बचावकार्य वेगाने सुरू करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीम आणि महाबळेश्वर ट्रेकर्स तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. खोल दरी, घनदाट जंगल आणि अत्यंत अवघड भौगोलिक परिस्थिती असूनही रेस्क्यू पथकांनी दोरखंड, सुरक्षासाधने आणि अन्य आवश्यक उपकरणांच्या सहाय्याने युद्धपातळीवर बचावकार्य राबवले. या मोहिमेत अजित जाधव, आशिष बिरामणे, अनिकेत वागदरे, संकेत सावंत, ऋषिकेश जाधव, साई हवलदार, विक्रांत जाधव, सुनील बाबा भाटिया, सुजित कोळी, अमीत कोळी, अनिल केळगणे तसेच इतर सहकारी मित्रांनी विशेष मेहनत घेतली.

या संपूर्ण घटनेदरम्यान पोलीस प्रशासनाने वेळीच सर्च अँड रेस्क्यू टीमच्या सदस्यांशी संपर्क साधून मदत बोलावली. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती, तर पोलिसांकडून वाहतूक नियंत्रणात ठेवण्याचे काम सुरू होते.

आंबेनळी घाटात यापूर्वीही वारंवार अपघातांच्या घटना घडल्या असून या दुर्घटनेमुळे घाटातील वाहतूक सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, दहा वर्षीय मुलाने दाखवलेल्या धैर्यामुळे आणि ११२ क्रमांकावर वेळेत केलेल्या कॉलमुळेच बचावकार्य सुरू होऊन मोठा अनर्थ टळल्याची भावना व्यक्त होत आहे.

# रसायनीत तरूणीचा विनयभंग

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

२२ वर्षीय तरूणी बोटाला दुखापत झाल्याने औषधोपचाराकरिता हॉस्पिटलमध्ये गेली होती. त्या हॉस्पिटलमधून येत असताना एका दुकानाजवळ एका अनोळखी स्कूटी चालकाने स्कूटी थांबवून तरूणीला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून विनयभंग केला.

यानंतर आरोपी अनोळखी स्कूटी चालक त्याची ताब्यातील स्कुटी घेवन निघून पळून गेला. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ७४ प्रमाणे नोंद करण्यात आली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पवार अधिक तपास करीत आहेत.

## थंडीमध्ये चढ-उतार

**पेण :** गारेगार थंडी बऱ्यापैकी स्थिरावली असून लोक उबदार कपडे, शेकोटीला पसंती देत आहेत. अशात थंडीत किंचितसा चढ-उतारही जाणवत आहे. काही वेळा कडाका वाढतो, तर कधी काहीसा उकाडा जाणवत आहे.

# रेल्वे वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल करून विविध प्रकल्पांची अंमलबजावणी

**रोहा : प्रतिनिधी**

विविध मार्गांवरील रेल्वे सेवांची मागणी सातत्याने वाढत असून मुंबई व उपनगरांमध्ये प्रवास सुलभ व्हावा व अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण ४००.५३ कि.मी. लांबीचे अंदाजे रु.१८,३६४.९४ कोटी खर्चाचे विविध रेल्वे प्रकल्प नियोजित करण्यात आले आहेत.रेल्वे मार्गांचे बांधकाम,विस्तार, विद्यमान सेवांचे उन्नतीकरण यांचा समावेश असलेले हे प्रकल्प सध्या अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांमध्ये आहेत.यामध्ये मध्य रेल्वे व पश्चिम रेल्वेवरील प्रकल्पांचा समावेश आहे.

मुंबईतील विविध टप्प्यांमध्ये अंमलबजावणी सुरू असलेल्या बहुविध रेल्वे प्रकल्पांमध्ये

मध्य रेल्वेवरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस कुर्ला ५ वा व ६ वा मार्ग प्रकल्पा अंतर्गत मध्य रेल्वेमार्फत राबविण्यात येणारा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस कुर्ला ५ वा व ६ वा मार्ग प्रकल्प, एकूण १७.५ ट्रॅक किलोमीटर लांबीचा असून अंदाजे रु ८९१ कोटी खर्चाचा आहे. हा प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये अंमलात आणला जात आहे. परळ ते कुर्ला दरम्यान १०.१ कि.मी. लांबीचा असून डिसेंबर-२०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. परळ ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दरम्यान ७.४ कि.मी. लांबीचा आहे. या प्रकल्पामुळे अधिक उपनगरी व लांब पल्ल्याच्या रेल्वे सेवा चालविण्यासाठी मार्गक्षमता वाढेल. विद्यमान मार्गांवरील गर्दी व विलंब कमी होईल.रेल्वे सेवांची एकूण वेळपालनता सुधार होणार आहे.

पनवेल कर्जत उपनगरीय कॉरिडॉर प्रकल्पा अंतर्गत पनवेल कर्जत उपनगरीय कॉरिडॉर प्रकल्प एकूण २९.६ ट्रॅक किलोमीटर लांबीचा असून अंदाजे रु २,७८२ कोटी खर्चाचा आहे. हा प्रकल्प एमआरव्हीसीमार्फत राबविण्यात येत आहे. सध्या माती भरावाचे काम तसेच बोगदे व पुलांच्या बांधकामाचे काम प्रगतीपथावर असून डिसेंबर-२०२५ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पामुळे पनवेल व कर्जत दरम्यान प्रवाशांसाठी नवीन उपनगरीय जोडणी उपलब्ध होऊन प्रवासाचा वेळ कमी होईल.कर्जतला जाण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध होईल. या मार्गावर उपनगरी रेल्वे सेवेची वारंवारता वाढू शकेल.

कल्याण आसनगाव ४ था मार्ग प्रकल्पा अंतर्गत मध्य रेल्वेमार्फत राबविण्यात येणारा कल्याण आसनगाव ४ था मार्ग प्रकल्प एकूण ३२ ट्रॅक किलोमीटर लांबीचा असून अंदाजे रु१,७५९ कोटी खर्चाचा आहे. हा प्रकल्प सध्या अंमलबजावणीच्या टप्प्यात आहे.भूमी संपादनाचे काम प्रगतीपथावर असून डिसेंबर २०२६ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पामुळे अधिक उपनगरी रेल्वे सेवा सुरू करण्यासाठी मार्गक्षमता वाढून गर्दी कमी होण्यास मदत होईल.उच्च घनतेच्या या मार्गावर विलंब कमी होऊन कार्यक्षमतेत सुधारणा होईल. प्रवासी तसेच मालवाहतूक सेवांसाठी भविष्यातील वाढत्या मागणीस पाठबळ मिळेल.

कल्याण बदलापूर ३ रा व ४ था मार्ग प्रकल्पा अंतर्गत कल्याण बदलापूर ३ रा व ४ था मार्ग प्रकल्प एकूण १४.०५ ट्रॅक किलोमीटर लांबीचा असून अंदाजे रु१,५१० कोटी खर्चाचा आहे. हा प्रकल्प एमआरव्हीसीमार्फत राबविण्यात येत आहे.

# तळाघर मराठी शाळेत विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी मेळावा

**धाटाव : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांनी अभ्यासासह सर्वत्र क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी, वकृत्व, गायन, नृत्य, नेतृत्व गुण आत्मसात करावे, शासन उच्च पदस्थ व्यक्ती होण्यासाठी प्रयत्नशील राहावे, आयटी क्षेत्र खुणावत आहे, यात नावात कमवावे असे विचार मंथन माजी विद्यार्थी संघ मेळाव्यात प्रकट झाले. तालुका, जिल्ह्यातील आदर्श जिल्हा परिषद मराठी शाळा तळाघर येथील आजी मुख्यतः माजी विद्यार्थ्यांचा मेळावा बुधवारी अत्यंत आनंदात विचारांच्या देवाणघेवाण चर्चेत साजरा झाला.

माजी विद्यार्थी संघ मेळावा सर्वच गाव, विभाग शाळेतील माजी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरावा असेच नियोजन केले होते. शाळेचे अनेक माजी विद्यार्थी आज पोलीस, विविध शासकीय, खाजगी कंपनी सेवेत उच्च पदावर आहेत. काही वरिष्ठ शासकीय सेवेत कामकाज करणारे निवृत्त झाले. त्याच माजी विद्यार्थ्यांनी मेळाव्याचे आयोजन केले होते.

कार्यक्रमात लहानग्या शालेय विद्यार्थ्यांना दिशा देण्याचे काम कारणी लागले. दरम्यान, माजी विद्यार्थी संघ मेळाव्यात निवृत्त अधिकारी यांसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला, तर माजी विद्यार्थी, तळाघर ग्रामस्थ, महिला यांच्या उपस्थितीतीत गायन, नृत्य, गप्पांत, गोड तिखट वनभोजन करण्यात आल्याने हा माजी विद्यार्थी मेळावा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरल्याचे अधोरेखीत झाले.

# निजामपूर विभागात राष्ट्रवादीला खिंडार; कार्यकर्ते शिवसेनेत

**माणगाव : बातमीदार**

निजामपूर विभागातील कांदळगाव खुर्द, चांदे आदिवासी वाडी, निजामपूर बौद्धवाडी, निजामपूर शहर व वीळे भाऊची आळी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील असंख्य कार्यकर्ते व ग्रामस्थांनी विकास पुरुष ना.भरतशेठ गोगावले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शिवसेना पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला.

या पक्षप्रवेशात हरिश्चंद्र भेसळ, स्वप्नील अवघडे यांच्यासह संबंधित गावांतील संपूर्ण ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला रामराम ठोकत, शिवसेनेचा भगवा झेंडा हाती घेतला. आतापर्यंत या गावांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांकडून अपेक्षित विकास न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी होती. याउलट, ना.भरतशेठ गोगावले यांच्या




## मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत प्रवेश समारंभ

मतदारसंघातील वाढता विकासाचा वेग, ठोस कामे व लोकाभिमुख दृष्टिकोन पाहून आपल्या गावांचाही असा सर्वांगीण विकास व्हावा हा एकमेव उद्देश घेऊन ग्रामस्थांनी शिवसेनेत प्रवेश केला. यापूर्वीच ना. भरतशेठ गोगावले यांनी या परिसरात मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून पाणीपुरवठ्यासह विविध विकासकामे मार्गी लावली आहेत, याचा थेट लाभ ग्रामस्थांना मिळालेला आहे.

याप्रसंगी बोलताना ना. भरतशेठ गोगावले यांनी शिवसेनेत प्रवेश केलेल्या सर्व ग्रामस्थांचे मनःपूर्वक स्वागत केले.

मंत्री किंवा आमदार या पदांपेक्षा मी तुमचा सेवेकरी म्हणून कायम उभा असेन. तसेच निजामपूर विभागाने मला विशेष साथ दिली असून, या विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव तत्पर राहीन. असं एकही गाव, वाडी किंवा वस्ती सापडणार नाही जिथे आमची विकासकामे पोहोचलेली नाहीत. माझ्यावर टीका करणाऱ्यांना मी केवळ आणि केवळ विकासकामांच्या माध्यमातूनच उत्तर देणार आहे.तसेच माझ्या संपूर्ण मतदारसंघातील एकही धार्मिक स्थळ विकासापासून वंचित राहणार नाही, असा मी शब्द देतो, असे म्हणाले.

या जाहीर पक्षप्रवेशामुळे निजामपूर विभागात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक भक्कम झाली असून, येत्या काळात विभागाच्या विकासाला आणखी गती मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

याप्रसंगी निजामपूर शहर आणि निजामपूर विभागातील महिला अध्यक्षा आणि आदिवासी युवक अध्यक्ष व जेष्ठ पदाधिकारी तसेच माजी सरपंच राजाभाऊ रणपिसे, युवासेना उपजिल्हा प्रमुख अविनाश नलावडे, गणेश समेळ, उपशहर प्रमुख नितीन बडे, युवा सेना शहर प्रमुख रफिक परदेशी, अच्युत तोंडलेकर, ज्येष्ठ नेते संदीप जाधव, माजी सरपंच गजानन मोहिते, सचिन मोरे आदी शिवसेना युवासेना महिला आघाडी व निजामपूर विभागातील विविध सामाजिक कार्यकर्ते व महिला भगिनी उपस्थित होत्या.

# पर्यटकांच्या उत्साहावर वाहतूक कोंडीचे पाणी!

## ख्रिसमस, नववर्ष स्वागतापूर्वीच रखडलेल्या बायपास कामाचा फटका



**माणगाव : प्रतिनिधी**

ख्रिसमस, शनिवार-रविवारच्या सलग सुट्ट्या आणि त्यातच थर्टी फर्स्टचा मुहूर्त साधत पुणे, मुंबईसह मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातून कोकणाकडे जाणाऱ्या पर्यटकांची अक्षरशः लोंढा उसळला आहे. मात्र या पर्यटन गर्दीचे स्वागत करण्यास माणगावची वाहतूक व्यवस्था पूर्णपणे अपयशी ठरत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

पुणे बाजूकडून ताम्हिणी घाट मार्गे माणगावकडे येणाऱ्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. तर मुंबई बाजूकडून कोकण व तळ कोकणात जाणाऱ्या वाहनांच्या रांगा सकाळपासूनच्च दोन ते तीन किलोमीटर अंतरापर्यंत पोहोचल्या होत्या. परिणामी माणगाव शहर व परिसरात भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. या वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवताना माणगाव पोलीस स्टेशन व वाहतूक शाखेच्या पोलिसांची अक्षरशः दमछाक झाली.

माणगाव बस स्थानक, निजामपूर रोड, कचेरी रोड, मोर्बा नाका या प्रमुख ठिकाणी विशेष पोलिस बंदोबस्त तैनात करून परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र वाहनांची संख्या इतकी मोठी होती की सर्व यंत्रणा अपुऱ्या पडताना दिसल्या. ख्रिसमसपासून थर्टी फर्स्टपर्यंत हीच स्थिती कायम राहणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत असून पुढील काही दिवस माणगावकरांसाठी मोठी परीक्षा ठरणार आहे.

मुंबई, पुणे, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातून येणारे हजारो पर्यटक दिवेआगार, श्रीवर्धन, बोर्ली, हरिहरेश्वर, मुरुड, जंजिरा यांसह कोकणातील विविध पर्यटनस्थळी मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. मात्र या पर्यटनाचा लाभ होण्याऐवजी माणगाव बाजारपेठ व अंतर्गत रस्त्यांवर वाहतुकीचा असह्य ताण पडत असून स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनाही प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

ई-मेल : panvelcorporation@gmail.com दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२
pmc.townplanning@gmail.com वेबसाईट - panvelcorporation.com

**जाहिर निविदा (निवडणुक कामी)**
**माहिती व जनसंपर्क विभाग**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत मतदान जनजागृतीसाठी SVEEP कार्याक्रमांतर्गत ३ D डिस्प्ले (IEC) साहित्य निर्मिती व स्थापना करणेकरीता त्रयस्त संस्थेची नेमणूक करणेकरीता जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत.

कामाचा अंदाजित खर्च खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत मतदान जनजागृतीसाठी SVEEP कार्याक्रमांतर्गत 3D डिस्प्ले (IEC) साहित्य निर्मिती व स्थापना करणेकरीता त्रयस्त संस्थेची नेमणूक करणेकरीता जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत. | ९,८५,०००/- (GST सह) |

सदर कामाबाबत अधिक माहिती पनवेल महानगरपालिकेच्या https://www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दिनांक २६/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदा संकेतस्थळावर दिनांक ३१/१२/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील, इच्छुक निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२५/**
**प्र.क्र. ७२२/७५८/२०२५**
**दिनांक :- २६/१२/२०२५**

**सही/-**
**(वैभव विधाते)**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे , कसळखंड तहसील- पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार मनिषा रोहन देशमुख, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे कसळखंड, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ५८/१ | १ | ०-०३-८० | ०-००-०० | ०-०३-८० | ०.४७ |
| ६० | १ | ०-०५-६० | ०-००-५० | ०-०६-१० पैकी ०-०३-५० | ०.४७ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २६/१२/२०२५

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६. मोबाईल : ८८८८२७१७५९



**जाहिर निविदा**

खालील गोष्टीसाठी आदर्श सोसायटी निविदा मागवत आहे.
१) उत्तम प्रतिचा मुरुम अंदाजे ६०० ब्रास करिता कोटेशन
२) वॉल पेटींग (Apex Asian Paint) अंदाजे १०,००० sq. ft. करिता कोटेशन
३) कंपाऊंड वॉल प्लास्टर अंदाजे २,१५० sq.ft. करिता कोटेशन
आदर्श को-ऑप. हौ.सी. लि. पनवेल ही संस्था तिच्या गार्डन वरील व ओपन स्पेस 'C' वरील वॉल करिता वर नमूद केलेली कोटेशन्स मागवत आहे.
इच्छुक व्यक्तिंनी आपली कोटेशन्स आजपासून आठ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर जमा करावीत.

**'आदर्श सोसायटी ऑफिस'**
पत्ता :- फ्लॅट नं ४०२, ४ था मजला
साई आदर्श बिल्डिंग, प्लॉट नं. ९, आदर्श सोसायटी
किनारा सोसायटी समोर, स्वामी नारायण मंदीर रोड
बावन बंगला एरिया, पनवेल - ४१०२०६
वेळ :- सकाळी ११ ते १ संध्याकाळी ५ ते ७

दिनांक : २७/१२/२०२५

**सही/-**
**संतोष मुनोथ**
**अध्यक्ष**
**आदर्श को-ऑप हौ. सो. लि., पनवेल**

# सुनियोजित शहरात वाहनतळांचे नियोजन विस्कळीत

**नवी मुंबई: रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई : सुनियोजित शहर म्हणून ओळख निर्माण केलेल्या नवी मुंबईत वाहनतळांचे नियोजन एक गंभीर समस्या बनली आहे. रस्त्यांवर दुतर्फा अनियंत्रितपणे उभी राहणारी वाहने, अपुरी वाहनतळ क्षमता आणि नियमांची सैल अंमलबजावणी यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेवर ताण वाढत असून, आपत्कालीन स्थितीत रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या वाहनांसाठीही अनेक ठिकाणी मार्ग उपलब्ध नसल्याचे चित्र आहे.



शहरातील वाहनतळाची समस्या दिवसेंदिवस गंभीर स्वरूप प्राप्त करत असून बेलापूर सेक्टर-१५ येथे ४७६ चारचाकी व १२१ दुचाकी वाहनांसाठी उभारण्यात आलेले बहुमजली वाहनतळ उद्घाटनाच्या काही महिन्यांतच बंद पडणे हे नियोजन आणि अंमलबजावणीतील विसंगतीचे ठळक उदाहरण आहे. काही भागांत वाहनतळाच्या नावाखाली अनधिकृत शुल्क वसुली होत असल्याच्या तक्रारींमुळे नागरिकांमधील असंतोष अधिक तीव्र झाला आहे.

एपीएमसी परिसरातही वाहनतळाची समस्या गंभीर बनली असून, राज्य आणि परराज्यातून येणारी अवजड वाहने तासंतास रस्त्याच्या कडेला उभी राहिल्याने परिसरात वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडणे ही नित्याची बाब बनली आहे.

याशिवाय वाशीतील पामबीच मार्गावरील कोपरी गाव प्रवेशद्वार, सतरा प्लाझा भागात असलेल्या गॅरेज व वाहन विक्री दुकानांमधील वाहने जागेअभावी रस्त्यावरच उभी करण्यात येत असल्याने शहरातील महत्वाचा रस्ता अरुंद होऊन वाहतूक मंदावण्याचे आणि अपघात घडण्याचे केंद्र बनले आहे.

"

बेकायदेशीरपणे वाहने उभी करणाऱ्या चालकांवर वाहतूक पोलिसांकडून वारंवार कारवाई करण्यात येते. अशा बेशिस्त वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठी विशेष मोहिमा राबवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाते. वाहतूक नियमांबाबत प्रबोधन केले जात आहे.
–विजय चौधरी, सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक विभाग नवी मुंबई

वाहने रस्त्याच्या दुतर्फा उभी केल्याने रस्ते अरुंद झाले आहेत. गर्दीच्या वेळी याचा त्रास अधिक सहन करावा लागत असून वाहतुकीचा प्रवाह मंदावल्याने वेळेचा अपव्यय होणे नित्याची बाब झाली आहे. अनेकदा वाहने रस्त्यावर अस्ताव्यस्त पद्धतीने उभी केल्याने अपघात होण्याचा धोकाही वाढला आहे.
–विकास पाटील, नागरिक, वाशी

# विमान उडताच एनएमएमटी धावली

## खांदेश्वर ते नवी मुंबई एअरपोर्ट बस सुरू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून गुरुवार २५ डिसेंबर रोजी विमानाचे पहिले उड्डाण करण्यात आले. तर दुसरीकडे विमानाच्या उड्डाणाच्या बरोबरच नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेने विमानतळ प्रवाशांसाठी

खांदेश्वर रेल्वे स्थानक (पुर्व) ते नवी मुंबई विमानतळ स्टाफ पार्किंग अशी वातानुकूलित बस सेवा सुरू करण्यात आली आहेत. आगामी कालावधीत नवी मुंबई विमानतळाला जोडणाऱ्या उरण, पनवेल बेलापूर वाशी येथून देखील बस सुविधा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती परिवहनच्या सूत्रांनी दिली आहे.

मार्ग क्रमांक -/५ अशी वातानुकूलित खांदेश्वर रेल्वे स्थानक पूर्व ते नवी मुंबई विमानतळ स्टाफ पार्किंगपर्यंत एनएमएमटीची बस धावणार आहे.



एकूण ४८ फेऱ्या दिवसभरात होणार आहेत. खांदेश्वर रेल्वे स्थानक, म्हाडा वसाहत, उड्डाणपूल, मोठा खांदा गाव, हायवे जोड रस्ता, कर्नाळा स्पोर्ट रोड पूल, सदानंद निवास सेक्टर आर ३ करंजाडे, गजन निर्मला सोसायटी करंजाडे, करंजाडे बस स्थानक सर्कल, पुरंदर रोड सर्कल, नवी मुंबई विमानतळ आपत्कालीन गेट, कार्गो विमानतळ गेट चेक नाका, ट्रक टर्मिनल, कार्गो टर्मिनल, नवी मुंबई विमानतळ स्टाफ पार्किंग, असा बसचा मार्ग असणार आहे.

खांदेश्वर रेल्वे स्टेशन सकाळी .६.३२ वाजता पहिली बस हॉटेल तर शेवटची बस रात्री १०.४७ वाजता सुटेल तर नवी मुंबई विमानतळ स्टाफ पार्किंग येथून सकाळी ६.५८ मिनिटांनी पहिली बस सुटेल तर रात्री ११.१३ वाजता शेवटची बस सुटेल. ३५ ते ४० मिनिटाच्या प्रवासासाठी वातानुकूलित बस सुविधाही दर ४५ मिनिटांनी प्रवाशांसाठी उपलब्ध असणार आहे.

या बससेवेमुळे खांदेश्वर येथून नवी मुंबई विमानतळ येथे कामानिमित्त जाणाऱ्या चाकरमानी तसेच इतर प्रवाशांना अधिक फायदा होणार आहे.

# महिला उद्योजकता विकासावरील चर्चासत्रास वाशीमध्ये प्रतिसाद



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई जनकल्याण महिला सहकारी संस्था व सहकार भारती आयोजित महिलांसाठी उद्योजकता विकास यावर आधारित चर्चासत्राचे आयोजन नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन या ठिकाणी २३ डिसेंबर (मंगळवार) रोजी करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजनामध्ये जया अलीमचंदाणी, कल्पना छत्रे, मॅक्वीन सालडाणा,सहकार भारती नवी मुंबई महामंत्री संतोष मिसाळ,उदय कुमार तांदळे, सुनील सावंत,आबा रणवरे,रश्मी सपकाळ यांनी मोलाचे सहकार्य केले.

यावेळी जया अलीमचंदाणी यांनी महिला उद्योजकांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळण्यासाठी प्रदर्शन, विविध उद्योगांचे प्रशिक्षण, आर्थिक निधी आदी बाबत माहिती दिली, सर्वश्री शितल पांचाळ, सुजाता मानवतकर, शैलेश दरगुडे, अश्विनी बुलाख आदिनी आपल्या उत्पादनाचे ब्रँडिंग महिलांनी कशा प्रकारे करायचे, जिल्हा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, सहकार भारती, गृहनिर्माण प्राकोष्ठचे कार्य आदींची माहिती दिली. सुनील खुजणारे, उपसंचालक, महाराष्ट्र शासन,मुंबई विभाग यांनी सरकार महिल उद्योजकतेसाठी करत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. अनेक महिला उद्योजिकाचा सहभाग होता.

# विज्ञान आधारित वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

पुणे विद्यार्थीगृहाचे विद्याभवन शैक्षणिक संकुल, नेरूळ व मराठी विज्ञान परिषद, नवी मुंबई विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नवी मुंबई स्तरीय आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ विद्याभवन सभागृहात बुधवारी प्रमुख पाहुणे नेहरू विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उमेश रूस्तागी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, दैनंदिन जीवनातच विज्ञान दडलेले असून विद्यार्थ्यांनी नेहमी प्रश्न विचारत राहिले पाहिजे. पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे यांनी विज्ञानाने अशक्य ते शक्य करून दाखवले असून विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करुन सर्वांगीण विकास साधावा,असे मार्गदर्शन केले.

या स्पर्धेत मराठी भाषा विभागात प्रथम क्रमांक स्वरांजली मोहिते(द्वितीय) ऋतुजा पाटील व आर्या चव्हाण, तर (तृतीय) वैष्णवी वणे, विभूती गुंजाळ व स्नेहल साळुंखे यांनी पटकावला. इंग्रजी विभागात (प्रथम) पाकी तिवारी, (द्वितीय) इशिता अरोरा व आफसिन जंजीकर तर (तृतीय) श्रेयांश महेंद्रकर, मानसी औताडे व आरिझ पटवेगार यांनी क्रमांक मिळवला. या शिवाय अलिशा चौधरी, स्वरा धोंडे, स्वरूप चाळके, यामिनी गोवारी, जानवी डाकवे, अन्सारी बली, रितिका मिश्रा, गार्गी कांबळे, प्रजेश इंगवले, शार्दुल कदम यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. सांघीक ट्रॉफी विद्याभवन शैक्षणिक संकुल, नेरूळ व नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ९३ यांनी पटकावली.

या प्रसंगी पुणे विद्यार्थी गृहाचे कुलसचिव दिनेश मिसाळ, मराठी विज्ञान परिषद नवी मुंबई अध्यक्ष डॉ. किशोर कुलकर्णी, शशिकांत धारणे, परीक्षक बिपिन भालचंद्र देशमाने,सदस्य विनय दिनकर, अजय दिवेकर तसेच मुख्याध्यापिका श्रीजा नायर, सुवर्णा मिसाळ, मुख्याध्यापक गोरख कदम, समन्वयक पांडुरंग मुळीक तसेच शिक्षकवृंद व कर्मचारी उपस्थित होते. शिक्षिका शीतल येनगे व मनोज मयेकर यांनी सूत्रसंचालन व बक्षीसे वाचन केले. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात युईएस कॉलेज अव्वल




**उरण : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभाग - अलिबाग तर्फे दिनांक २३ ते २४ डिसेंबर ह्या कालावधी मध्ये सेंट विल्फ्रेड स्कूल, शेडुंग, पनवेल येथे रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शन २०२५-२६ आयोजन केले होते. ह्या प्रदर्शनामध्ये एकूण ४५ शाळा व कॉलेजने सहभाग घेतला होता. ज्यात यु. ई. एस. ज्युनिअर कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला तर निबंध स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षिस मिळविले. तसेच आता हा यु. ई. एस. चा प्रकल्प, राज्यस्तरीय विज्ञान प्रकल्पासाठी पात्र ठरला आहे.


विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी एसटीइएम ह्या विषयावर ज्यु. कॉलेजच्या एकूण १५ विद्यार्थ्यांनी प्रकल्प तयार करुन प्रदर्शनात सहभाग घेतला होता. ज्यास एकूण ४५ शाळा व कॉलेजमधून प्रथम क्रमांक मिळाला तर कु. भार्गवी मंदार जाधव हिस निबंध स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.

ह्या प्रकल्पासाठी मार्गदर्शन करणारे ज्यु. कॉलेजचे प्रतिक प्रशांत पाटील व कु. केतकी चंद्रविलास ठाकूर ह्यांचे व सर्व सहभागी विदयार्थ्यांचे यु .ई. एस. संस्थेचे कमिटी मेंबर्स व स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या व समन्वयक, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका ह्यांच्याकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे. व आता थोड्याच दिवसांनी होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातही यु. ई. एस. चे विद्यार्थी व शिक्षक घवघवीत यश मिळवून कौतुकास पात्र ठरतील, ह्यात तिळमात्रही शंका नाही.

# 'केबीपी'ला राष्ट्रीय युवा राजदूत पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजला हैद्राबाद येथील हार्टफुलनेस इन्सिटिट्युट (कान्हा शांती वनम) केंद्राकडून दि. १९ डिसेंबर रोजी राष्ट्रीय पातळीवरील युवा राजदूत पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कॉलेजच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी हा पुरस्कार नॅक व एनबीएचे चेअरमन डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते हैद्राबाद येथे स्वीकारला.




महाविद्यालयातील स्वयं विकास समितीने गेल्या पाच वर्षात विद्यार्थी , प्राध्यापक व कर्मचारी यांचा मनोविकास करण्यासाठी स्वयं विकासावर आधारित अभ्यासक्रमाची रचना केली. हा अभ्यासक्रम शिकवण्यासाठी प्राध्यापकांना हैद्राबाद येथे प्रशिक्षण देण्यात आले. आतापर्यंत १२ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे. कॉलेजने विद्यार्थी व सेवकांच्या स्वयं विकासासाठी केलेले प्रयत्न भरीव व आदर्श आहेत. हे लक्षात घेऊन हैद्राबाद येथील हार्टफुलनेस इन्सिटिट्युट सेंटर (कान्हा शांती वनम) यांचेकडून सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

२०१४ पासून कॉलेजमध्ये स्वयंविकास अभ्यासकम राबवला जात आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या भावनिक, सामाजिक, नैतिक व्यवस्थापनासाठी व नेतृत्व कौशल्य विकसित करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो.

विद्यार्थ्यांना त्यांच्या संपूर्ण विकासात मदत करतो. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही स्वयं व मूल्य-आधारित शिक्षणाची तरतूद केली आहे. महाविद्यालयातील स्वयं विकास समितीच्या चेअरमन मनमिंदर रियात आणि त्यांच्या सर्व सदस्यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे सदर पुरस्कार मिळाल्याचे प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी सांगितले. या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# डॉ. पारनेरकर महाराज विद्यालयाची विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये भरारी



**मोहोपाडा: प्रतिनिधी**

वाशिवली येथील डॉ.पारनेरकर महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ५वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांचे हिवाळी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी नऊ वाजेला संस्थेचे अध्यक्ष तुलसीदास पाटील, सचिव अनंता दळवी , सदस्य एकनाथ पाटील, संस्थेचे कोषाध्यक्ष व प्राचार्य डॉ.अनिल पाटील व शिक्षक प्रतिनिधी प्रल्हाद माळी यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले.

यावर्षी खो-खो, कबड्डी, गोळा फेक, १०० व २०० मीटर धावणे व क्रिकेट अशा विविध स्पर्धांमध्ये मुलांनी व मुलींनी हिरीरीने सहभाग घेतला.या विविध स्पर्धांमध्ये विजयी विद्यार्थी होते त्या संघाला हायटेक कार्बन बिर्ला कंपनीचे एच.आर.अधिकारी हरीष रावत, माजगाव केंद्रप्रमुख जय परदेशी व प्रशांत गायकवाड, शिक्षकेतर प्रतिनिधी अनिल पगारे यांच्याहस्ते ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच शासनातर्फे अधिकारी व कर्मचारी यांचे विविध स्पर्धांचे राज्यस्तरावर आयोजन करण्यात आले होते .या स्पर्धेमध्ये डॉ.पारनेरकर महाराज विद्यालय वाशिवली येथील मृदुला मुकुंद वरुडे यांनी विभागीय स्तरावर रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला व कुमुदिनी महेश म्हात्रे यांनी कथाकथन स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळविल्याबद्दल व तालुका विज्ञान प्रदर्शनात जतिन पाटील याच्या प्रतिकृतीस तृतीय क्रमांक मिळाल्याबद्दल प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी संस्थेतर्फे सन्मानित केले.

या स्पर्धेचे सूत्रसंचलन प्रल्हाद माळी यांनी केले.स्पर्धांचे यशस्वी आयोजन व नियोजन करण्यामध्ये प्रामुख्याने सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी योगदान दिल्याबद्दल प्राचार्य डॉ.ए.आर.पाटील यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# १०० दिवे लावून स्व. वाजपेयींना श्रद्धांजली

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय राजकारणातील एक प्रमुख व्यक्तिमत्व आणि राष्ट्रीय विचारवंत भारतरत्न तसेच देशाचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची १०० व्या जयंती सानपाडा येथे साजरी करण्यात आली.

अनोख्या पद्धतीने श्रद्धांजली अर्पण करताना १०० दिवे लावून वाजपेयी यांच्या स्मृती जगविण्यात आल्या.सानपाडा येथील भाजप कार्यालयात एका भव्य समारंभात शताब्दी सोहळा पार पडला. भाजपाचे संयोजक राजेश राय यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे हे शताब्दी वर्ष देशभरात सुशासन दिन म्हणून साजरे केले जात आहे.

यावेळी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ.राजेश पाटील, कोकण विभाग प्रतिनिधी अभिजीत पेडणेकर, मित्रमंडळ भाजपा प्रदेश संयोजक सतीश निकम, ज्येष्ठ कवी अरविंद शर्मा राही,गोपाळराव गायकवाड, अधिवक्ता रमेश त्रिपाठी, मुनिद्रा झा, संपदा कुंडल, आबा जगताप , जगनाथ कुंडे, पांडुरंग आमले, भाऊ भापकर, शैला पाटील, मंदाकिनी कुंजीर, पंडित द्वारका प्रसाद भट, किरण सिंग, दीपक जगताप व इतर मान्यवर उपस्थित होते.



# वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात थॅलेसेमिया जनजागृती व तपासणी शिबिर




**उरण : रामप्रहर वृत्त**

तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे झड- इंडिया यांच्या माध्यमातून अर्पण रक्तपेढी व अर्पण थॅलेसेमिया सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने थॅलेसेमिया जनजागृती व तपासणी शिबिराचे दिनांक २३ व २४ डिसेंबर या दोन दिवसीय आयोजन करण्यात आले. डॉ.रचना पवार यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

या वेळी दक्षता आग्रे, संचिता जाधव, इरम शेख, नेहा शर्मा व विकेश वानखेडे यांच्या तज्ज्ञ टीमने विद्यार्थ्यांची थॅलेसेमिया आजारासंदर्भात तपासणी केली. विद्यार्थ्यांचे रक्तनमुने घेऊन ते मुलुंड, मुंबई येथील अर्पण रक्तपेढी येथे सखोल तपासणीसाठी पाठविण्यात येतात. त्या तपासणीच्या आधारे आजाराचे अचूक निदान करण्यात येते.

सदर शिबिर विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिराचे यशस्वी नियोजन विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, दि. रयत सेवक को-ऑप. बँकेचे संचालक प्रा. किशोर पाटील,ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबूलाल पाटोळे, सायन्स विभागप्रमुख प्रा. झुंझार माने, कॉमर्स विभागप्रमुख प्रा. ऋषिकेश धुरी, आरोग्य समिती प्रमुख प्रा. केशव पवार, प्रा.अरुण देवरे कार्यालयीन प्रमुख नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर,तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये थॅलेसेमिया आजाराबाबत जनजागृती वाढण्यास मदत झाली असून, वेळेवर तपासणी व निदानाचे महत्त्व अधोरेखित झाले. यावेळी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी शिबिराचा लाभ घेतला.

## बेटी बचाओ बेटी पढाओ!

# ‘पोस्को’च्या अभियानातून १०० मुलींना लाभ

**माणगाव : प्रतिनिधी**

औद्योगिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधीतून ग्रामीण भागातील मुलींच्या उज्वल भविष्यासाठी एक आश्वासक पाऊल उचलले आहे. केंद्र सरकारच्या बेटी बचाओ बेटी पढाओ या योजनेला बळ देत कंपनीने भागाड ग्रामपंचायत हद्दीतील प्रत्येक पात्र बालिकेच्या नावे ५० हजार रुपयांची मुदत ठेव करण्याचा उपक्रम यशस्वीपणे राबवला आहे. सन २०१७पासून सुरु असलेल्या या उपक्रमाद्वारे आतापर्यंत १०० मुलींना या योजनेचा लाभ मिळाला आहे.




या योजनेचे मुख्य वैशिट्य म्हणजे, ही ५०,००० रुपयांची ठेव मुलगी १८ वर्षाची होईपर्यंत सुरक्षित राहते व त्यानंतर व्याजासह मिळणारी रक्कम मुलीला तिचे उच्च शिक्षण किंवा व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी उपयोगात येते. आर्थिक टंचाईमुळे ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षण अपूर्ण राहू नये हा या मागचा मुख्य उद्देश आहे.

भागाड ग्रामपंचायत कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमात २०२४मध्ये जन्मलेल्या पाच मुलींना मान्यवरांच्या हस्ते मुदत ठेव प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या वेळी माणगावच्या गटविकास अधिकारी शुभदा पाटील यांनी कंपनीच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, पोस्को कंपनीने केवळ उद्योग उभारला नाही, तर इथल्या समाजाशी नाते जोडून मुलींच्या जन्माचे स्वागत करण्याची संस्कृती रुजवली आहे. अशा उपक्रमांमुळेच ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होत आहे.

पोस्को महाराष्ट्र स्टीलचे वरिष्ठ अधिकारी जी. युन पार्क यांनी कंपनीची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले मुलींचे सक्षमीकरण हा केवळ एका कुटुंबाचा नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राच्या विकासाचा पाया आहे. हा उपक्रम खरोखरच खास आहे, कारण तो भारत सरकारच्या बेटी बचाओ, बेटी पढाओ योजनेशी सुसंगत आहे, जो लिंग समानता आणि मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देतो. आम्ही स्थानिक समुदायांना त्यांच्या पायावर उभे करण्याकरिता प्रयत्न करत आहोत आणि भविष्यातही आमचा हा प्रयत्न अधिक व्यापक स्वरुपात सुरु राहील.

या कार्यक्रमाला पोस्कोचे वरिष्ठ अधिकारी, गटविकास अधिकारी माणगाव, भागाड ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, उपरपंच, सदस्य, पदाधिकारी, मुलींचे पालक आदी उपस्थित होते.

# गरोदर मातांची आरोग्य तपासणी आणि ओटी भरण समारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई येथील युनायटेड वे ही स्वयंसेवी संस्था कर्जत तालुक्यात कुपोषण निर्मूलन आणि आरोग्य क्षेत्रात कार्य करीत आहे. आदिवासी आणि ग्रामीण भागातील गरोदर माता पोषण आहारापासून मदत करणाऱ्या या संस्थेकडून गरोदर मातांची महिलांची तपासणी केली जाते. त्यांच्या या कार्याला मदत करण्यासाठी रायगड हॉस्पिटल अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर मदत करीत असून पहिल्या टप्प्यात ६० गरोदर मातांची आणि त्यांच्या पोटातील बाळाची अत्याधुनिक मशीन द्वारे तपासणी करण्यात आली.

दरम्यान, या सर्व गरोदर मातांचे ओटी भरण आणि आरोग्य तपासणी आदी कार्यक्रमात आशा सेविकांचादेखील सहभाग होता.

रायगड हॉस्पिटल आणि युनायटेड वे यांच्या प्रोजेक्ट पोषण यांच्याकडून गर्भवती स्त्रियांचे तपासणी करण्यात आली. पहिल्या टप्प्यात ६० गरोदर मातांची तपासणी उपक्रमाचं शुभारंभ रायगड हॉस्पिटल अ‍ॅण्ड रिसर्च सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ कुशाग्र पटेल यांच्या हस्ते करण्यात आला. रायगड हॉस्पिटलमध्ये अशा तपासणीसाठी एक स्वतंत्र वॉर्ड तयार करण्यात आला आहे. या तपासणीसाठी कर्जत तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील ६० गरोदर माता सहभागी झाल्या होत्या. सर्वप्रथम या सर्व गरोदर माता यांची फुलांनी सजवलेल्या झोपल्यावर बसवून ओटी भरण्यात आली. त्यानंतर या महिलांना युनायटेड वेकडून औषधांचे खास किट देण्यात आले. या महिलांचे येथे तपासणी स्त्रीरोग डॉक्टर यांनी केली. या वेळी महिलांच्या तपासणी अत्याधुनिक मशीनद्वारे करण्यात आली. त्या मशीनचे आधारे माता आणि पोटात असलेल्या बाळाची माहिती मिळत होती. त्या मशीनमधून विविध ५४ आजारांविषयी माहिती मिळत होती.

या सर्व आजारांवर कशाप्रकारे मात करता येईल यांच्यावर उपाययोजना करण्याचे उद्दिष्ट रायगड हॉस्पिटलकडून ठेवण्याचा आहे. जर असे आजार या महिलांमध्ये आढळून आले तर यांच्यावर मोफत उपचार केला जाईल. यामध्ये ज्या गरोदर महिला आहेत त्यांच्या गर्भामध्ये जे मुलं आहेत यांचे आरोग्य चांगले होणार यासाठी यांची तपासणी वेळेवर केली पाहिजे म्हणून रायगड हॉस्पिटल मधून तसेच प्रोजेक्ट पोषण यांच्या माध्यमातून आज ही तपासणी करण्यात आले ज्या महिलांना त्रास होत असेल तर हे या मशीनच्या माध्यमातून कळणार आहे आणि ६० महिला आलेले आहेत. यांच्याही सर्व तपासण्या करण्यात येणार आहे आणि हे त्यांच्यासाठी खूप महत्त्वाचे असल्याचे येथील शिव यांच्याकडून बोलण्यात आले, मात्र या महिलांना आणखी औषधांची आवश्यकता असेल तर आम्ही यांना मदत करणार व गरोदर महिलांची तपासणी सोनोग्राफी आणि दर महिन्याला रूटीन चेकअप करणे हे सर्व सुविधा रायगड हॉस्पिटल पुरविणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ कुशाग्र पटेल यांनी जाहीर केले आहे. युनायटेड वे कडून दर पंधरा दिवसांनी अशा गरोदर मातांची तपासणी केली जात असते.

युनायटेड वेकडून रेखा जाधव, खंडू मंजिले, राजेश क्षीरसागर, अर्चना पाटील, पिंकी कवठे, वेदांती बडेकर, दीपक गुप्ता, सचिन चतुरे, प्रवीण खंडवी यांच्याकडून हा उपक्रम कर्जत तालुक्यात राबविला जात आहे.




# किसान क्रांती संघटना जिल्हाध्यक्षपदी भरत राणे

**कर्जत : प्रतिनिधी**

किसान क्रांती संघटना यांच्या रायगड जिल्ह्याच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा शेतकरी दिनाच्या कार्यक्रमात करण्यात आली. किसान क्रांती संघटनेचे कर्जत तालुका कमिटीचे अध्यक्ष भरत राणे यांना बढती देण्यात आली असून त्यांच्यावर जिल्हा अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष टी.एस. देशमुख यांनी या सर्व नियुक्त्या जाहीर केल्या.



किसान क्रांती संघटना राज्यात शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन कार्य करीत आहे. या संघटनेच्या वतीने रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा मेळावा शेतकरी दिनाचे औचित्य साधून करण्यात आला होता. या मेळाव्यात रायगड जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना संस्थापक अध्यक्ष देशमुख यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यात रायगड जिल्ह्याचे नवीन अध्यक्ष म्हणून कर्जत तालुक्याचे अध्यक्ष भरत राणे यांच्यावर जबाबदारी देण्यात आली आहे. तर मावळते जिल्हाध्यक्ष उत्तम शेळके यांना राज्य कार्यकारिणीवर नियुक्त करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. जिल्ह्याचे संपर्कप्रमुख म्हणून रामदास माळी यांना नियुक्त करण्यात आले. कर्जत तालुका प्रवक्ते सुरेश खानविलकर यांची रायगड जिल्हा प्रवक्ते म्हणून नियुक्ती करण्यात आली. जिल्हा कमिटी सदस्यपदी जगन्नाथ पाटील यांना नियुक्त करण्यात आले आहे. कर्जत तालुकाध्यक्ष म्हणून मावळते उपाध्यक्ष शरद तवळे यांची निवड करण्यात आली. सल्लागार म्हणून काशिनाथ धुळे, कर्जत तालुका संपर्कप्रमुख लक्ष्मण शिनारे, तसेच महिला तालुका कमिटी अध्यक्षपदी शिल्पा लोभी, उपाध्यक्ष आशा कोळंबे, सचिव गायत्री ऐनकर, सहसचिव मधुरा शेळके, संपर्कप्रमुख अश्विनी भवारे, सदस्य दीपा रुठे आणि सल्लागार सुमन भोईर यांची नियुक्ती करण्यात आली.

या वेळी हभप शिवनाथ बाबा तुपे, राज्य उपाध्यक्ष श्रीधर जंजीरकर, संपर्कप्रमुख सुरेश मस्के, मुख्य संघटक विनायक देशमुख आदी उपस्थित होते.

## श्रीवर्धनमध्ये गुटखाविक्री सुरूच

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरासह संपूर्ण तालुक्यामध्ये गुटख्याची अवैध विक्री जोरदारपणे पुन्हा एकदा सुरू झाली आहे.

रायगडच्या पोलीस अधीक्षकपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर आंचल दलाल यांनी अवैध धंदे करणाऱ्यांचे कंबरडे मोडले होते, परंतु काही दिवस उलटून गेल्यानंतर श्रीवर्धन तालुक्यामध्ये पुन्हा एकदा गुटख्याची विक्री सुरू झाली आहे. काही दिवसांपूर्वी श्रीवर्धन पोलिसांनी एका गुटखा विक्रेत्यावर धाड टाकून अंदाजे ९८ हजार रुपयांचा गुटखा जप्त केला होता. त्यानंतर गुटखा विक्री दिवस बंद होती, पण आता पुन्हा गुटखा विक्री सुरू झाल्याचे चित्र आहे.

# अ‍ॅड. सोनिया सूद यांचे चित्रकला प्रदर्शन

**अलिबाग : प्रतिनिधी**

दिल्ली येथील सुप्रीम कोर्टात वकील म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या अ‍ॅड. सोनिया सूद यांनी अलिबाग डोंगरे हॉलमध्ये आपल्या चित्रकलेचे प्रदर्शन भरवले आहे.

सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांचे वंशज रघुजीराजे आंग्रे यांच्या हस्ते या चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी रजिता माळवी, हेमंत सोनार, ओजस् पाटील, अ‍ॅड. जयंत चेउलकर आदी उपस्थित होते.



अ‍ॅड. सोनिया सूद यांनी ही चित्रे अ‍ॅक्रलिक कलरचा वापर करून साकारली आहेत. या चित्रातून सूद यांची श्रीकृष्णावरील निष्ठा, प्रेम दिसून येते

उद्घाटनाच्या निमित्ताने अलिबागमधील प्रख्यात गायक योगेश काळेबेरे, अजित पवार, लीना अभ्यंकर, मुरूड येथील योगेश भोसले यांनी हिंदी, मराठी गाणी सादर करून एक वातावरण निर्मिती केली. या वेळी सार्वजनिक वाचनालयाच्या अध्यक्ष शैला पाटील आवर्जून उपस्थित होत्या. हे प्रदर्शन २८ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

# स्नेहसंमेलनात शिवराज्याभिषेक सोहळ्याचा देखावा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा येथील जंजिरा विद्या मंडळ संचालित सर एस. ए. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन नुकतेच पार पडले. संस्थेचे अध्यक्ष सुधाकर दांडेकर तसेच प्रमुख अतिथी निवृत्त जॉईंट कमिशनर ऑफ कस्टम अँड सेंट्रल एक्ससाइज घनश्याम सिताराम आरेकर यांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडला.



या वेळी रंगावली, चित्रकला, हस्तकला व विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन तसेच शैक्षणिक पारितोषिक वितरण समारंभसुद्धा पार पडला. प्रमुख अतिथी राष्ट्रीय सुवर्णपदक विजेती पॉवरलिफ्टिंगपटू समिधा भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध गुणदर्शन व क्रीडा पारितोषिक वितरण झाले. उपाध्यक्ष प्रतिभा जोशी, सचिव चंद्रकांत अपराध, संचालक प्रमोद भायदे, अभय दिवेकर, विजय वाणी, उदय दांडेकर श्रीमती सुशीला म्हात्रे, पांडुरंग आरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी विविध गुणदर्शन कार्यक्रमात शिवराज्याभिषेक सोहळा हा विशेष कार्यक्रम विद्यार्थ्यांनी साजरा केला. इयत्ता १०वी ते १२वी वर्गातील विद्यार्थ्यांनी हा सोहळा चांगल्या रितीने सादर केला.

यासाठी शालेय विद्यार्थ्यांनी शिवकालीन वस्त्र परिधान करून त्याच प्रमाणे त्याकाळातील भाले, तलवारी व ढाली यांचा वापर करून एक जिवंत देखावा स्नेहसंमेलनात साकार करण्यात येऊन लोकांची वाहवा मिळवली.

यासाठी राहुल वर्तक व केतन वर्तक यांनी विशेष मेहनत घेतली. शाळेचे सर्वच कार्यक्रम मुख्याध्यापक सरोज राणे, पर्यवेक्षक तथा कार्याध्यक्ष भास्कर मोरे, सांस्कृतिक प्रमुख श्रीमती घुगे, शिंदे तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना य ावेळी कार्यक्रम सादर करण्यास विशेष मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपाली रोटकर यांनी केले.

# अलिबाग, मुरूड बीच पर्यटकांनी फुलले



**अलिबाग : प्रतिनिधी**

नाताळच्या सुट्टीत पर्यटनासाठी लोक कुटुंबासह बाहेर पडले आहेत. पर्यटकांनी अलिबागला पसंती दिली आहे. त्यामुळे अलिबाग शहर आणि आसपासच्या परिसरातील हॉटेल, ग्रामीण भागातील कॉटेजेसची बुकिंग फुल्ल झाली असून समुद्रकिनारा पर्यटकांनी फुलल्याचे चित्र आहे..

शाळा-महाविद्यालयांना नाताळची सुट्टी पडली आहे. त्याला लागून शनिवार, रविवार सुट्टीचे दिवस आहेत. त्यामुळे लोक पर्यटनासाठी बाहेर पडले. मुंबई, पुणे, ठाणे या शहरांपासून जवळ असल्यामुळे पर्यटकांनी अलिबागला पसंती दिली आहे. काही दिवसांपूर्वीच अलिबाग शहरातील तसेच आसपासच्या परिसरातील हॉटेल्स् आणि कॉटेजेस् आरक्षित केले आहेत.

अलिबागसह मांडवा, आवास, किहिम, वरसोली, अलिबाग, आक्षी, नागाव, समुद्र किनाऱ्यांवर सुट्टीत पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक या आले आहेत.

मुंबईहून सागरी सफर करीत अलिबागला पोहचता येते. तिथून पुढे रायगडमधील अन्य ठिकाणी जाता येते. या प्रवासाची गंमत वेगळी आहे. अलिबागसह मांडवा, नागाव, काशिद किनाऱ्यांवर पर्यटकांनी गर्दी होत आहे.

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

मुरुड तालुक्यातील काशीद, मुरूड, नांदगाव व ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांनी मोठी गर्दी केली आहे. राजपुरी येथे जंजिरा किल्ल्याचे तिकीट काढण्यासाठी पर्यटकांची रांग लागली. राजपुरीकडे जाणारा रास्ता अरुंद असल्याने ट्रॅफिक जाम झाली. सायंकाळी ४ वाजता समुद्राचे पाणी ओहोटी असल्याने कमी झाले व ते जेटीला लागत नसल्याने शेकडो पर्यटक किल्ला न पाहताच परतले.

दुसऱ्या दिवशी सकाळी एकत्र आल्याने जेटीवर गर्दी झाली. शाळांच्या सहली दार दिवशी १२ गाड्या येत असल्याने जंजिरा किल्ल्यात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी दिसून आली.

समुद्र किनारी मोठ्या संख्येने पर्यटक अवतरले असून नाताळ सुट्टीचा आनंद घेत आहेत पर्यटकांनी गुरुवार सायंकाळपासून गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. हळूहळू सर्व लॉज फुल होत आहेत. समुद्र किनारी असणाऱ्या प्रत्येक स्टॉलवर गर्दी पहावयास मिळत आहे. लहान मुले वाळूत किल्ले बनवण्याचा आनंद घेताना दिसत आहेत

पर्यटकांमुळे मुरूडच्या मुख्य बाजारपेठेतसुद्धा गर्दी दिसून आली. विविध वस्तू खरेदीसाठी पर्यटक बाजारपेठेत आले होते, तर काही जण समुद्र स्नान, बोटिंग, उंट सफारी, बनाना रायडिंग आदींचा आनंद लुटताना दिसत होते. पर्यटकांची संख्या वाढल्याने प्रत्येक घटकाला स्वयंरोजगार प्राप्त झाला आहे. त्यामुळे ते सुखावले आहेत.



# पिटसई विद्यालयात क्रीडा स्पर्धा, आनंद मेळावा



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयात नुकतीच आंतरशालेय क्रीडा स्पर्धा आणि आनंद मेळावा उत्साहात झाला. शालेय विद्यार्थ्यांच्या कला-क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी दरवर्षी या स्पर्धा घेण्यात येतात.

मुख्याध्यापक अरुण खुळपे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या क्रीडा स्पर्धेत कबड्डी, खो-खो, क्रिकेट, लगोरी आदी खेळ रंगले. या स्पर्धेचे उद्घाटन चेअरमन खेळू वाजे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ज्येष्ठ शिक्षक अकील मुलाणी, सचिव संजय रेडीज, उपाध्यक्ष गो.म. ठाकूर, दामोदर वाघमारे, माजी विद्यार्थी संदीप मोडक, सामाजिक कार्यकर्ते गणेश बामणे आदी उपस्थित होते.

या वेळी चेअरमन खेळू वाजे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, खेळाप्रति प्रेम ठेवल्यास खेळात निश्चित प्रगती होईल. एखाद्या खेळात प्रगती करण्यासाठी नियमित सराव करणे खूप गरजेचे आहे. नियमित सराव केला तर खेळात प्रगती होणार यात कोणतीही शंका नाही. विद्यार्थ्यांनी सरावावर अधिक भर द्यावा.

मुख्याध्यापक खुळपे यांनी नियमित अभ्यासाबरोबर खेळामध्ये लक्ष देऊन प्रगती साध्य करण्याचे आवाहन केले.

विद्यालयात आनंद मेळावासुद्धा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांनी चायनीज भेळ, पाणी पुरी, सँडविच व इतर विविध चविष्ट पदार्थ बनवले. सर्व विद्यार्थ्यांनी याचा आस्वाद घेतला. क्रीडा स्पर्धा व आनंद मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# ‘विराट’ विक्रमाला कोहलीची गवसणी

## लिस्ट ए क्रिकेटमध्ये नोंदवली सर्वोच्च सरासरी



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

विजय हजारे ट्रॉफी २०२५ स्पर्धेत विराट कोहली आणि रोहित शर्मासारखे दिग्गज खेळाडू मैदानात उतरले आहेत. या स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात दोघांनी दमदार शतके झळकावली, मात्र दुसऱ्या सामन्यात रोहितला हवी तशी सुरुवात करून देता आली नाही. दुसरीकडे विराटने दुसऱ्या सामन्यातही दमदार अर्धशतकी खेळी केली. या अर्धशतकी खेळीसह त्याने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.

दिल्लीचा दुसरा सामना गुजरातविरुद्ध रंगला. बंगळुरूतील सेंटर ऑफ एक्सेलेंसच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात दिल्लीचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला होता. विराट तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना त्याने ६१ चेंडूत ७७ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने १३ चौकार आणि एक षटकार मारला.

दिल्लीकडून डावाची सुरूवात करण्यासाठी प्रियांश आर्य आणि अर्पित राणा ही जोडी मैदानावर आली होती, पण या जोडीला हवी तशी सुरुवात करून देता आली नाही. दिल्लीकडून विराट तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने दमदार अर्धशतकी खेळी केली. यासह विराट कोहलीच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. त्याने लिस्ट ए क्रिकेटमध्ये सर्वोच्च सरासरी नोंदवली आहे.

विराटनने लिस्ट ए क्रिकेटमध्ये ५७.८७च्या सरासरीने धावा केल्या आहेत. या मोठ्या विक्रमात त्याने ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज मायकल बेवनचा विक्रम मोडून काढला आहे. बेवनने ५७.८६च्या सरासरीने धावा केल्या होत्या.

# माजी क्रिकेटपटू जाफर उद्या रोह्यात

**धाटाव : प्रतिनिधी**



भारताचा माजी कसोटी सलामीवीर व नामवंत क्रिकेटपटू वसीम जाफर रोहा येथे आयोजित करण्यात येत असलेल्या रोहा ग्रामीण प्रीमियर लीग २०२५ क्रिकेट स्पर्धेला रविवारी (दि. २८) दुपारी २ वाजता भेट देणार आहे.

राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या विशेष प्रयत्नामुळे जाफर हा रोहा नगरीतील तालुका क्रीडा संकुल येथील स्पर्धेसाठी येणार असल्याची माहिती रोहा ग्रामीण लीगच्या आयोजकांनी दिली. या वेळी तालुक्यातील मान्यवर लोकप्रतिनिधी, प्रशिक्षक, खेळाडू आणि क्रीडाप्रेमी नागरिक उपस्थित राहणार आहेत. जाफर यांच्या उपस्थितीत युवा क्रिकेटपटूंना प्रत्यक्ष मैदानावर मार्गदर्शन मिळणार आहे.

# ‘आरडीसीए’च्या क्रिकेट स्पर्धेत कामोठे संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १६ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत पचौरी क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाने विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात कामोठे संघाने रोशन क्रिकेट अकॅडमी संघाचा २२ धावांनी पराभव करत स्पर्धेची चॅम्पियनशिप पटकावली आहे.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पचौरी क्रिकेट अकॅडमी संघाने ४० षटकांमध्ये ९ गडी बाद १८४ धावा केल्या होत्या. त्यामध्ये श्रेयस गोवारी याने सर्वाधिक ५७, आदित्य कांटेने ४१ आणि प्रज्वल गोवारीने ३७ धावा केल्या. रोशन क्रिकेट अकॅडमीकडून आयुष धनावडे याने दोन फलंदाजांना बाद केले. प्रत्युत्तरात रोशन क्रिकेट अकॅडमी संघाने ३७.१ षटकांमध्ये सर्व गडी गमावत १६२ धावा केल्या. त्यामध्ये हर्षल पाटील याने ३१ आणि निखिल अहिरवालने २५ धावांचे योगदान संघाला दिले. पचौरी संघाकडून कर्णधार अनिश म्हात्रे व अंकित म्हात्रे यांनी प्रत्येकी तीन गडी बाद करून संघाला २२ धावांनी विजय मिळवून दिला.

संपूर्ण स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज म्हणून श्रेय पाटील, (प्रतीक अकॅडमी), उत्कृष्ट गोलंदाज व मालिकावीर अनिश म्हात्रे (पचौरी अकॅडमी), उत्कृष्ट क्षेत्ररक्षक मंथन पाटील (जगदीश अकॅडमी) यांची निवड करण्यात आली.

विजेते संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सहसचिव जयंत नाईक, सदस्य प्रदीप खलाटे, मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी, पेण स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष अरुण शिंदे, पचौरी क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक वीरू पचौरी, रोशन क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक रोशन अडे, पंच सुरेश म्हात्रे, अभिजित वाडकर, आदेश नाईक यांच्या हस्ते चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# विजय हजारे ट्रॉफीमध्ये राजेश मोहंतीची हॅट्ट्रिक



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

ओडिशाचा वेगवान गोलंदाज राजेश मोहंती याने बंगळुरू येथील अलूर क्रिकेट स्टेडियम (ग्राउंड क्रमांक ३) रंगलेल्या सामन्यात ऐतिहासिक कामगिरी करून दाखवली आहे. सर्व्हिसेसविरुद्धच्या एलिट फेरीतील सामन्यात त्याने हॅट्ट्रिकचा डाव साधला. आपल्या ३९व्या लिस्ट-ए सामन्यात त्याने ही ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे.

नाणेफेक जिंकल्यावर ओडिशा संघाने पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. सातव्या षटकात राजेश मोहंती याने सलामीवीर सागर दहिया याला बाद केले. त्यानंतर सलग दोन चेंडूंवर अमित शुक्ला आणि रवी चौहान यांना पायचित करत त्याने हॅट्ट्रिक पूर्ण केली. लिस्ट ए क्रिकेटमध्ये ओडिशा संघाकडून हॅट्ट्रिक नोंदवणारा तो पहिला गोलंदाज ठरला आहे. या सामन्यात त्याने नऊ षटकात २५ धावा खर्च करताना चार विकेट्स घेतल्या. त्याच्या भेदक माऱ्याच्या जोरावर सर्विसेसच्या संघाचा डाव अवघ्या ८३ धावांत आटोपला. ओडिशा संघाने चार विकेट्स राखून हा सामना खिशात घातला.

# रिंकू सिंहची बॅट तळपली

## चंदिगडविरुद्धच्या सामन्यात तुफानी शतक

राजकोट : वृत्तसंस्था



विजय हजारे ट्रॉफीमध्ये भारतीय फलंदाज उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. यादरम्यान रिंकू सिंगची बॅट तळपली असून त्याने शानदार शतक झळकावले आहे. उत्तर प्रदेश आणि चंदीगड यांच्यातील सामन्यात कर्णधार रिंकू व अन्य फलंदाजांच्या योगदानाच्या मदतीने संघाने ५० षटकांत ३६७ धावांचा डोंगर उभारला आहे.

रिंकू सिंगने अवघ्या ५६ चेंडूत त्याचे शतक पूर्ण केले. शतकी खेळी करत तो नाबाद परतला. रिंकूने ६० चेंडूत ११ चौकार व चार षटकारांच्या मदतीने १०६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. आगामी टी-२० विश्वचषक २०२६साठी रिंकूची भारतीय संघात निवड झाली आहे. शतकी खेळीसह त्याने निवडकर्त्यांचा निर्णय अगदी योग्य असल्याचा पुन्हा एकदा सिद्ध केले.

रिंकू सिंगने विजय हजारे ट्रॉफीतील पहिल्या सामन्यात ४८ चेंडूत ६७ धावांची खेळी केली, तर दुसऱ्या सामन्यात त्याने नाबाद १०६ धावांची खेळी करत आपला फॉर्म कायम ठेवला. रिंकूची लिस्ट ए क्रिकेट व फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये ५० अधिक सरासरी आहे, तर टी-२० सामन्यांमध्ये त्याची सरासरी ३३ असून त्याचा स्ट्राईक रेट १४७ अधिक आहे.

चंदीगढ संघाने नाणेफेक जिंकत रिंकू सिंहच्या संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले होते. यूपी संघाची सुरुवात खराब झाली. पण दुसरा सलामीवीर आर्यन जुयाल याने १३४ धावांची वादळी खेळी केली. आर्यनने ११८ चेंडूत सात चौकार व आठ षटकारांसह १३४ धावांची खेळी केली. ध्रुव जुरेलने ५७ चेंडूत ११ चौकारांसह ६७ धावा केल्या, तर समीर रिझवीने ३२ धावांचे योगदान दिले. यानंतर कर्णधार रिंकू सिंगने ६० चेंडूत १०६ धावांची नाबाद खेळी करत चंदीगढ संघाला विजयासाठी ३६८ धावांचे मोठे आव्हान दिले आहे.

# राष्ट्रीय बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये श्रुती, पारुल, तन्वीची आगेकूच

**विजयवाडा : वृत्तसंस्था**

वरिष्ठ राष्ट्रीय बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये अनुभवी श्रुती मुंदडा, पारुल चौधरी आणि उदयोन्मुख खेळाडू तन्वी पत्री यांनी आपल्यापेक्षा सरस मानांकित प्रतिस्पर्ध्यांना पराभवाचा धक्का देत महिला एकेरीची उपउपांत्यपूर्व फेरी गाठली.

श्रुती मुंदडाने सातव्या मानांकित जिया रावतचा २१-१४, २१-९ असा सरळ सेटमध्ये पराभव करत तिला स्पर्धेतून बाहेरचा रस्ता दाखवला. दुसऱ्या एका चुरशीच्या लढतीत पारुल चौधरीने नवव्या मानांकित खेळाडूवर १८-२१, २१-१८, २१-१२ अशी मात करत पुढील फेरीत प्रवेश केला. त्याचप्रमाणे युवा तन्वी पत्रीने आठव्या मानांकित ईशाराणी बरुआचे आव्हान २२-२०, २१-१९ असे संपुष्टात आणले. याव्यतिरिक्त उन्नती हुडा, अनुपमा उपाध्याय, अनमोल खरब आणि तन्वी शर्मा यांनीही पुढची फेरी गाठली.

पुरुष एकेरीमध्ये आर्यमान टंडनने मोठी उलटफेर करत तिसऱ्या मानांकित एम. रघूचा १७-२१, २१-११, २१-१४ असा पराभव केला. अभिनव गर्ग आणि ऋत्विक संजीव एस. यांनीही अनपेक्षित विजय मिळवत उपउपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केले.

# थोरल्या भावाने दिली धाकट्याला पदार्पणाची कॅप

## सरफराज-मुशीर खानची शतकी भागीदारी

**जयपूर : वृत्तसंस्था**



विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील उत्तराखंडविरुद्धच्या सामन्यात मुंबईच्या संघाने मुशीर खान या युवा अष्टपैलू खेळाडूला पदार्पणाची संधी दिली. खास गोष्ट ही की, त्याचा थोरला मोठा भाऊ आणि टीम इंडियाकडून खेळलेल्या सरफराज खान यानेच आपल्या धाकट्या भावाला मुंबई लिस्ट ए क्रिकेटमधील पदार्पणाची कॅप दिली.

मुंबईच्या ताफ्यातील हा क्षण दोन्ही भावांसह खान कुटुंबियासह खास आणि अविस्मरणीय असा होता. एवढेच नाही तर या सामन्यात दोन्ही भावांनी अर्धशतकी खेळी करताना समान धावा काढल्या. त्यामुळे मुंबई विरुद्ध उत्तराखंड यांच्यातील सामन्यात एक कमालीचा योग दिसून आला.

मुंबईच्या संघाचा कर्णधार शार्दुल ठाकूर याने जयपूरच्या सवाई मानसिंह स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजीचा निर्णय घेतला. भारताचा माजी कर्णधार आणि मुंबईचा सलामीवीर बॅटर रोहित शर्मा या सामन्यात पहिल्याच चेंडूवर बाद झाला. युवा सलामीवीर अंगकृष्णही २० चेंडूत ११ धावांची भर घालून चालता झाला. मुंबईच्या संघाने २२ धावांवर दोन्ही सलामीवीरांच्या विकेट गमावल्या होत्या. संघ अडचणीत असताना खान बंधूंची जोडी जमली. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ९० चेंडूत १०७ धावांची भागीदारी रचत संघाला अडचणीतून बाहेर काढले.

याशिवाय विकेट किपर बॅटर हार्दिक तोमरे याने केलेल्या नाबाद ९३ धावा आणि शम्स मुलानीच्या ४८ धावांच्या जोरावर मुंबईच्या संघान निर्धारित ५० षटकात सात विकेट्सच्या मोबदल्यात ३३१ धावा करत उत्तराखंड संघासमोर ३३२ धावांचे टार्गेट सेट केले.

### समान धावांचा योगायोग

*विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत पदार्पणाचा सामना खेळणाऱ्या मुशीर खान याने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना सात चौकाराच्या मदतीने ५६ चेंडूत ५५ धावांची खेळी केली. दुसऱ्या बाजूला सरफराज खान याने पाच चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ५५ धावा केल्या. दोघे भाऊ तेवढ्याच सम-समान धावांचे योगदान देऊन माघारी फिरले. हा एक कमालीचा योगायोग या सामन्यात पहायला मिळाला.*

# न्यूझीलंडच्या संघांचे सँटेनर, ब्रेसवेलकडे नेतृत्व

**वेलिंग्टन : वृत्तसंस्था**

भारतात पुढील महिन्यात होणाऱ्या वनडे आणि टी-२० मालिकेसाठी न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने आपले संघ जाहीर केले असून टी-२० संघाचे नेतृत्व अष्टपैलू मिचेल सँटेनरकडे, तर वनडे संघाचे नेतृत्व मायकेल ब्रेसवेलकडे सोपवले गेले आहे. न्यूझीलंडचे प्रमुख खेळाडू केन विल्यम्सन, जेकब डफी आणि रचिन रवींद्र दुखापतीमुळे खेळू शकणार नाहीत.

न्यूझीलंडचा संघ भारतात तीन वनडे आणि पाच टी-२० सामने खेळणार आहे. वेगवान गोलंदाज काईल जेमिसन दुखापतीतून सावरल्यानंतर दोन्ही संघांत पुनरागमन करत आहे तसेच मार्क चॅपमन आणि मॅट हेन्री टी-२० संघात परतले आहेत. डावखुरा फिरकीपटू जेडन लेनोक्सला प्रथमच आंतरराष्ट्रीय संघात स्थान मिळाले आहे. त्याचबरोबर ख्रिश्चन क्लार्क हा आणखी एक नवा चेहरा एकदिवसीय संघात समाविष्ट करण्यात आला आहे.

या दौऱ्यातील वनडे मालिका ११ जानेवारीपासून, तर पाच सामन्यांची टी-२० मालिका २१ जानेवारीपासून सुरू होईल. भारत व श्रीलंकेत फेब्रुवारी २०२६मध्ये होणाऱ्या आगामी आयसीसी टी-२० विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर ही मालिका दोन्ही संघांसाठी विशेष महत्त्वाची मानली जात आहे.

**टी-२० संघ** : मिचेल सँटेनर (कर्णधार), मायकेल ब्रेसवेल, मार्क चॅपमन, डेव्हॉन कॉनवे (यष्टिरक्षक), जेकब डफी, झॅक फॉल्क्स, मॅट हेन्री, काईल जेमीसन, बेव्हॉन जेकब्स, डॅरिल मिचेल, जेम्स नीशाम, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, टीम रॉबिन्सन, ईश सोधी.

**वन डे संघ** : मायकेल ब्रेसवेल (कर्णधार), आदित्य अशोक, ख्रिश्चन क्लार्क, जोश क्लार्कसन, डेव्हॉन कॉनवे, झॅक फॉल्क्स, मिच हे (यष्टिरक्षक), काईल जेमीसन, निक केली, जेडन लेनोक्स, डॅरिल मिचेल, हेन्री निकोल्स, ग्लेन फिलिप्स, मायकेल रे, विल यंग.

# वैभव सूर्यवंशीचा प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने गौरव



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा युवा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी (वय १४) सातत्याने आपल्या कामगिरीतून क्रिकेटविश्वात नवे विक्रम प्रस्थापित करत आहे. आयपीएलमध्ये सर्वात कमी वयात शतक झळकावण्याचा मान मिळवल्यानंतर नुकत्याच झालेल्या विजय हजारे ट्रॉफीतील पहिल्याच सामन्यात १९० धावांची विक्रमी खेळी करत त्याने पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष वेधून घेतले. क्रिकेटमधील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत भारत सरकारकडून वैभवला अत्यंत मानाचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

क्रिकेटमधील उत्कृष्ट आणि प्रेरणादायी कामगिरीसाठी वैभव सूर्यवंशीला देशातील सर्वोच्च बाल सन्मान ‘प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार’ देण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विजय हजारे ट्रॉफीमध्ये बिहार संघ शुक्रवारी (दि. २६) आपला दुसरा सामना खेळत असताना पुरस्कार समारंभामुळे वैभवला सामन्याला मुकावे लागले. विशेष म्हणजे फक्त वैभवच नाही तर या कार्यक्रमात शौर्य, क्रीडा, संगीत, विज्ञान आदी क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या देशभरातील गुणवंत मुलांना सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार वैभवसाठीच नव्हे, तर त्याच्या संपूर्ण कुटुंबासाठी अभिमानाचा क्षण ठरला. वैभवचा मोठा भाऊ उज्ज्वल सूर्यवंशी याने सोशल मीडियावर वैभवचा पुरस्कार स्वीकारतानाचा फोटो शेअर करत भावना व्यक्त केल्या. त्याने लिहिले, देशाच्या राष्ट्रपतींच्या हस्ते वैभवला बाल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे.

# ‘बॉक्सिंग डे’ कसोटीत गोलंदाजांचा बोलबाला!

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

ऐतिहासिक मेलबर्न क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या ‘बॉक्सिंग डे’ अ‍ॅशेस कसोटीचा पहिला दिवस क्रिकेट इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिला गेला आहे. वेगवान गोलंदाजीला पोषक खेळपट्टी आणि प्रेक्षकांचा अभूतपूर्व उत्साह यांच्या साक्षीने पहिल्याच दिवशी चक्क २० गडी बाद झाले. पहिल्या डावाच्या अखेरीस यजमान ऑस्ट्रेलियाने इंग्लंडवर निसटती, पण महत्त्वाची आघाडी मिळवली आहे.

इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा धाडसी निर्णय घेतला. त्याचा हा निर्णय जोश टंगने सार्थ ठरवला. टंगने कांगारूंच्या फलंदाजीला खिंडार पाडत पाच बळी टिपले आणि ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव अवघ्या १५२ धावांत गुंडाळला. ऑस्ट्रेलियाकडून मायकल नेसरने सर्वाधिक ३५ धावांची झुंजार खेळी केली. नेसरने फलंदाजीनंतर गोलंदाजीतही चमक दाखवत चार बळी घेतले, तर स्कॉट बोलँडने तीन गडी बाद केले. त्यामुळे इंग्लंडचा डाव ११० धावांत संपुष्टात आला.

# मुंबईच्या संघात रोहित शर्माचा डुप्लिकेट




**जयपूर : वृत्तसंस्था**

विजय हजारे ट्रॉफीमध्ये रोहित शर्मा दीडशतकी खेळी केल्यानंतर दुसऱ्या सामन्यात गोल्डन डकवर बाद झाला. यादरम्यान रोहित शर्मा व मुंबईच्या विकेटकिपरचा फोटो व्हायरल होत आहे, ज्यामध्ये विकेटकिपर हा अगदी रोहितसारखा दिसत आहे.

सिक्कीम आणि मुंबई यांच्यातील सामन्यात फिल्डिंग करतानाचा हा फोटो आहे. रोहित शर्माच्या दीडशतकी खेळीच्या जोरावर मुंबईने विजय हजारे ट्रॉफीला विजयाने सुरुवात केली. त्यानंतर आता जयपूरमध्ये होत असलेल्या मुंबईने ३३१ धावांचा डोंगर उभारला आहे. रोहितला फलंदाजी करताना पाहण्यासाठी जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियममध्ये चाहत्यांनी गर्दी केली होती, पण रोहित पहिल्याच चेंडूवर बाद झाला. या सामन्यात रोहितसारख्या दिसणाऱ्या या खेळाडूने मात्र ९३ धावांची खेळी केली आहे.

रोहित शर्माबरोबर व्हायरल फोटोमधील या खेळाडूचे नाव हार्दिक तामोरे आहे. हार्दिक हा मुंबई संघाचा यष्टीरक्षक फलंदाज आहे. रोहित क्षेत्ररक्षण करताना स्लिपमध्ये उभा असतो. सामन्यात षटकांदरम्यानचा रोहित व हार्दिकचा फोटो क्लिक करण्यात आला आहे, जे पाहून चाहते अवाक् झाले.

हार्दिक तामोरेने विजय हजारे ट्रॉफीतील दुसऱ्या सामन्यात त्याने संघाचा डाव सावरत मोठी धावसंख्या गाठून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने ८२ चेंडूत सात चौकार व दोन षटकारांसह ९३ धावांची खेळी केली. यासह मुंबई ३३१ धावांपर्यंत पोहचू शकली.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com